जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बांधकाम कामगारांचे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर धरणे

## नोंदणी पोर्टल तात्काळ सुरू करा, मुलांची शिष्यवृत्ती पूर्ववत करण्याची मागणी

नगर – राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यात यावी, अन्यायकारक शासन निर्णय मागे घेण्यात यावेत तसेच बांधकाम कामगारांच्या मुलां– साठीची शैक्षणिक शिष्यवृत्ती पूर्ववत सुरू करावी, या प्रमुख मागण्यांसाठी लोकशाही बांधकाम कामगार व इतर कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने ३ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर शहरातील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. कर्जतसह जिल्ह्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने बांधकाम कामगार मोर्चाने आंदोलनस्थळी दाखल झाले. घोषणाबाजी करत शासनाच्या धोरणांचा निषेध करण्यात आला.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव भैलुमे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आंदोलनात महिला व पुरुष कामगारांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. आंदोलनस्थळी कामगारांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.


नगर येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करताना बांधकाम कामगार.

राज्य शासनाने बांधकाम व इतर कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये बदल करून अनेक नवीन अटी व निर्बंध लागू केले आहेत. त्यामुळे पात्र असूनही अनेक कामगार योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. विशेषतः कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मिळणारी शिष्यवृत्ती बंद करण्यात आल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसमोर मोठे संकट उभे राहिले असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

कामगारांचे म्हणणे आहे की, शिष्यवृत्ती बंद झाल्याने शिक्षणाचा वाढता खर्च पेलणे अनेक कुटुंबांना शक्य होत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येण्याची भीती निर्माण झाली आहे. शासनाचा हा निर्णय कामगारांच्या मुलांच्या भवितव्याशी खेळणारा असून तो तात्काळ मागे घेण्यात यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनादरम्यान कामगारमंत्री आकाश पुंडकर यांच्या निषेधार्थ पुतळा दहन करण्याची तयारी करण्यात आली होती. मात्र, पोलीस प्रशासन आणि सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलकांनी पुतळा दहन स्थगित केले.

शंकरराव भैलुमे यांनी शासनावर टीका करताना सांगितले की, शासन कॉन्ट्रॅक्टच्या नावाखाली कामगारांकडून पैसे उकळण्याचे काम करत असून कामगारांच्या नावाखाली फसव्या योजना आणि जाहिराती प्रसिद्ध केल्या जात आहेत. अनेक महत्त्वाच्या कल्याणकारी योजना बंद करण्यात आल्याने लाखो कामगार अडचणीत आले आहेत. राज्यभर मोठ्या प्रमाणावर बांधकाम कामगारांची नोंदणी प्रलंबित असून नोंदणीचे पोर्टल बंद असल्यामुळे कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळत नाही.

भैलुमे यांनी शासनाला इशारा देताना सांगितले की, पंधरा दिवसांच्या आत बांधकाम कामगार नोंदणीचे पोर्टल सुरू झाले नाही आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लागले नाहीत, तर चार ते पाच हजार कामगारांच्या सहभागातून तीव्र आंदोलन छेडले जाईल. शासनाविरोधात राज्यभर असंतोषाची लाट निर्माण होत असून सरकारने वेळेत कामगारांच्या प्रश्नांची दखल घ्यावी.

आंदोलनानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी भोसले यांनी कामगारांच्या मागण्या राज्य शासनाच्या वरिष्ठ स्तरापर्यंत सकारात्मक पद्धतीने पोहोचवून त्यावर योग्य तो विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

# भुईकोट किल्ल्याच्या खंदकात आढळला मृतदेह

नगर – शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या खंदकात एका अनोळखी पुरूषाचा मृतदेह आढळून आला आहे. २ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास किल्ला परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या नागरिकांना खंदकात मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ भिंगार कॅम्प पोलिसांना याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

मृतदेह खंदकात असल्याने तो बाहेर काढण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाला पाचारण करण्यात आले. मात्र खंदकातील पाणी आणि अंधारामुळे रात्री मृतदेह बाहेर काढण्याचे काम थांबविण्यात आले. ३ ऑगस्ट रोजी अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी ताब्यात घेतला.

प्राथमिक माहितीनुसार, मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात पाठविण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीने आत्महत्या केली की त्याचा घातपात झाला, याबाबत अद्याप कोणताही निष्कर्ष समोर आलेला नसून पोलीस सर्व शक्यतांचा तपास करीत आहेत.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# भिंगारमध्ये न्यायालयात दावा सुरू असतानाही घर पाडले

## जेसीबी चालवून कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न, दोघांसह १० जणांवर गुन्हा

नगर – भिंगार येथील सदर बाजार भागात एका घरावरून न्यायालयात स्टे (जैसे थे परिस्थिती) असतानाही काही लोकांनी बेकायदेशीर जमाव जमवून जेसीबीच्या साहाय्याने घर पाडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत घरात झोपलेल्या कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

याबाबत वसीम गुलामअहमद मीर यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह सदर बाजार, पावर हाऊसजवळ राहत आहेत. या घराबाबत त्यांच्या कुटुंबाचा निता वसंत राठोड व वसंत राठोड यांच्याविरोधात अहिल्यानगर न्यायालयात दिवाणी दावा सुरू आहे. न्यायालयाने या जागेवर जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. असे असतानाही आरोपी वसंत राठोड, चंद्रकांत उजागरे आणि त्यांच्यासोबत आलेल्या ८ ते १० अनोळखी महिला व पुरुषांनी बेकायदेशीर जमाव जमवला. आरोपींनी जेसीबीच्या मदतीने वसीम मीर यांचे राहते घर पाडण्यास सुरुवात केली.

यावेळी वसीम मीर आणि त्यांच्या घरातील सदस्यांनी त्यांना विरोध केला असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली. घरातील नागरिक आत असताना घर पाडून त्यांचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने हे कृत्य करण्यात आले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेत पीडित कुटुंबाच्या संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी वसीम मीर यांच्या तक्रारीवरून वसंत राठोड, चंद्रकांत उजागरे यांच्यासह इतर अनोळखी आरोपींविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.


एमआयडीसीत बोगस कचरा वेचकांच्या नावाखाली संशयितांचा वावर असून त्यांच्या चौकशी करावी असे निवेदन एमआयडीसी पोलिसांना देताना कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे पदाधिकारी.

# न्यायालयाच्या वॉरंटनंतर मोक्कातील आरोपी विजय पठारे जेरबंद

नगर – शहरात संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून दहशत निर्माण करणाऱ्या विजय राजू पठारे (रा. सिध्दार्थनगर) याला अटक करण्यात तोफखाना पोलिसांना यश आले आहे. त्याच्यासह टोळीविरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कारवाईनंतरही त्याला अटक झाली नसल्याने त्याच्यासह तिघांविरूध्द जिल्हा व सत्र न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले होते. पोलिसांनी त्याची अंमलबजावणी करत पठारे याला अटक केली आहे. वॉरंटमधील आणखी दोघे पसार आहेत.

१५ मार्च २०२६ रोजी फिर्यादी, त्यांचे पती, मुलगा, सून आणि नातू यांच्यावर विजय पठारेच्या नेतृत्वाखालील टोळीने लोखंडी कोयता, तलवार आणि लाकडी दांडक्यांनी हल्ला केला. यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा सखोल अभ्यास केला. त्यामध्ये विजय पठारे आणि त्याच्या टोळीविरूध्द तोफखाना, कोतवाली आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गंभीर स्वरूपाचे एकूण १२ गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. संघटित गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेऊन विजय पठारे, अजय पठारे, किरण जेधिया, सनी चावरे आणि नीलेश ससाणे या पाच आरोपींविरूध्द मोक्का कायद्याची वाढीव कलमे लागू करण्यात आली होती.

दरम्यान, पाच पैकी दोघांना पोलिसांनी अटक केली होती. तर, विजय पठारे, अजय पठारे आणि सनी चावरे पसार होते. त्यांच्याविरूध्द वॉरंट जारी केल्यानंतर तोफखाना पोलिसांनी ३ ऑगस्ट रोजी शेंडी बायपास परिसरातून विजय पठारे याला ताब्यात घेतले.

# पत्रकार प्रशांत वाव्हळ यांचे निधन



नगर – नगर शहरातील पत्रकार प्रशांत सयाजीराव वाव्हळ (वय ४५) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने पत्रकारिता क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू आणि समर्पित सहकारी हरपला आहे.

पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी दैनिक नगर टाईम्स, दैनिक सार्वमत, दैनिक प्रभात, दैनिक पुढारी आणि दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रांमध्ये उपसंपादक म्हणून जबाबदारीने कार्य केले. सध्या ते दैनिक ‘नवराष्ट्र’ मध्ये उपसंपादक पदावर कार्यरत होते. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.

# वंदनाबाई तांदुळवाडकर यांचे निधन



नगर – दादा चौधरी विद्यालयाच्या माजी शिक्षिका सौ. वंदनाबाई वसंत तांदुळवाडकर (वय ८२) यांचे ३ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या मागे मुलगा उन्मेष तांदुळवाडकर, सून डॉ. ऋचा तांदुळवाडकर, नात असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रेमळ, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.


# येल्लुबाई मंचे यांचे दु:खद निधन



नगर – दातरंगे मळा येथील रहिवासी श्रीमती येल्लुबाई शंकर मंचे (वय ७२) यांचे ४ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजू मंचे यांच्या त्या मातोश्री होत.

# शरद वाडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी शरद आनंदा वाडेकर (वय ५२) यांचे ३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन



कोल्हापूर – पद्मश्री डॉ. डी. वाय. (ज्ञानदेव यशवंतराव) पाटील (वय ९०) यांचे ४ ऑगस्ट रोजी सकाळी कोल्हापूर येथे वयोमानानुसार उद्भवलेल्या आरोग्य समस्येमुळे निधन झाले.

२२ ऑक्टोबर १९३५ रोजी जन्मलेल्या डॉ. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण आणि समाजसेवेसाठी समर्पित केले. त्यांनी स्थापन केलेल्या डी. वाय. पाटील समूहाच्या माध्यमातून देशभरात १८२ हून अधिक शैक्षणिक संस्था, सात अभिमत विद्यापीठे, आंतरराष्ट्रीय शाळा तसेच विविध आरोग्य सेवा संस्था उभारल्या. शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते.

डॉ. पाटील यांनी महाराष्ट्र विधानसभेचे आमदार म्हणूनही काम केले. त्यानंतर त्यांनी बिहारचे राज्यपाल, त्रिपुराचे राज्यपाल आणि पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणूनही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. शिक्षण आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारत सरकारने १९९१ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. डॉ. डी. वाय. पाटील हे महाराष्ट्रातील काँग्रेसचे आमदार सतेज (बंटी) पाटील यांचे वडील होत.

# राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा फसवणूकप्रकरणी दाखल गुन्ह्यात पोलिसांच्या ताब्यात

श्रीगोंदा – शासकीय योजना व जमीन विकास व्यवसायात मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून सॉफ्टवेअर इंजिनिअरसह त्यांच्या नातेवाईकांची २ कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राष्ट्रवादी नेते प्रविणकुमार उर्फ बाळासाहेब बन्सीलाल नाहाटा यांना पुणे पोलिसांनी श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. याप्रकरणी अजय श्यामकांत चौधरी आणि प्रविणकुमार उर्फ बाळासाहेब बन्सीलाल नाहाटा यांच्याविरुद्ध पुण्यातील डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

वाकड येथील रहिवासी राहुल रामराजे मकेदार (वय ४३, सॉफ्टवेअर इंजिनिअर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, नोव्हेंबर २०२३ मध्ये मकेदार यांची अजय चौधरी (संचालक, गजनिया शेल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याशी ओळख झाली. त्यानंतर चौधरी व नाहाटा यांनी मॅग्रेट (महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट) ही महाराष्ट्र शासनाची योजना असल्याचे सांगून गुंतवणुकीचे आमिष दाखवले. नाहाटा यांनी आपण महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सदस्य असल्याचे सांगून योजनेत धोका नसल्याचे भासवले.


राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा यांना फसवणुकीच्या गुन्ह्यात पुणे पोलिसांनी श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले.

२० लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर ७८ दिवसांत ६० लाख रुपये परतावा मिळेल, असे सांगून मकेदार, त्यांची पत्नी, बहिणी व सासरे यांच्याकडून पैसे घेतल्याचा आरोप आहे. अधिक परताव्याचे आमिष दाखवून घरातील सोने–चांदीचे दागिने विकण्यासही भाग पाडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच पाचगाव (हॅरिसन फॅमिली) येथील जमीन विकसित करण्याच्या नावाखाली अजय चौधरी यांनी मकेदार यांच्याकडून १ कोटी ६० लाख रुपये ऑनलाइन व रोख स्वरूपात घेतल्याचा आरोप आहे. अशा प्रकारे शासकीय योजनेच्या नावाखाली १ कोटी व जमीन विकासाच्या नावाखाली १ कोटी ६० लाख, अशा एकूण २ कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात प्रविणकुमार उर्फ बाळासाहेब नाहाटा यांना ताब्यात घेण्यात आले.

# महिलेचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्याला पोलिसांनी पकडले

## महिलेचे धाडस अन डायल ११२ वर कॉल करताच पोलीस पोहोचले घटनास्थळी

नगर – वडगाव गुप्ता रस्ता परिसरामध्ये एका विवाहित महिलेचा पाठलाग करून अश्लील इशारे करणाऱ्या भामट्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. पीडित महिलेने दाखवलेल्या धाडसामुळे आरोपी तत्काळ पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

वडगाव गुप्ता रोड परिसरात राहणाऱ्या एका महिलेचा मागील चार ते पाच दिवसांपासून एक अनोळखी इसम पाठलाग करत होता. घरासमोरून ये–जा करताना तो महिलेकडे पाहून असभ्य आणि लज्जास्पद इशारे करत असे. ३ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास महिला घराबाहेर उभी असताना, आरोपीने पुन्हा तिथे येऊन तिची छेड काढली आणि तिला स्वतःकडे बोलावण्याचा प्रयत्न केला.

महिला घाबरली, परंतु तिने धीर न सोडता तात्काळ घरात जाऊन आपल्या पतीला फोनवरून घडलेला प्रकार सांगितला. पतीने काही वेळातच घरी धाव घेतली. पतीला आलेले पाहून आरोपीने तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पतीने त्याला जागेवरच पकडून ठेवले. महिलेने प्रसंगावधान राखून तात्काळ डायल ११२ वर फोन करून पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच तोफखाना पोलिसांचे पथक अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीचे नाव बापुसाहेब यादव कोऱ्हाळे (रा. उघडमळा, वडगाव गुप्ता) असल्याचे समोर आले आहे.

# पीएम किसान ई–केवायसी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याची मागणी

नगर – पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या ई–केवायसी प्रक्रियेमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी अहिल्यानगर येथील नंदकिशोर बाबासाहेब घुले यांनी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे ई–मेलद्वारे केली आहे.

घुले यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, २२ मे २०२६ पासून पीएम किसान योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करताना सर्व्हर डाऊन राहणे, संकेतस्थळ व्यवस्थित कार्यरत नसणे अशा अडचणी सातत्याने येत आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण होत नसून त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. तसेच, कागदपत्रांच्या अपलोडसाठी २०० केबीची मर्यादा असल्याने अनेक महत्त्वाची कागदपत्रे अस्पष्ट दिसतात व अर्ज मंजूर होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ही मर्यादा २५० केबीपर्यंत वाढवावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे. याशिवाय, गेल्या महिनाभरापासून मोबाईल किंवा ऑनलाइन माध्यमातून ई–केवायसी प्रक्रिया सुरळीत होत नसल्याने राज्यातील व देशातील लाखो शेतकरी अडचणीत आले आहेत. संबंधित तांत्रिक समस्या तातडीने दूर करून ई–केवायसी प्रक्रिया सुरळीत सुरू करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून केंद्र सरकारने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# दारूच्या नशेत गोंधळ घालणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर – तारकपूर बसस्थानकाच्या आऊट गेटसमोर दारूच्या नशेत जोरदार आरडाओरडा करत गोंधळ घालणाऱ्या आणि रिक्षा संघटनेचे दोन बॅनर फाडून नुकसान करणाऱ्या एका तरुणावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल निवृत्ती गाडेकर (वय २९, रा. प्रगती हॉटेलजवळ, बोल्हेगाव, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार महेश बाळासाहेब शेळके यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २ ऑगस्ट रोजी रात्री नऊच्या सुमारास आरोपी राहुल गाडेकर याने मद्यप्राशन करून सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातला. तसेच तेथील रिक्षा संघटनेचे दोन बॅनर फाडून नुकसान केले. या घटनेची माहिती मिळताच डायल ११२ च्या पथकातील पोलीस कर्मचारी महेश शेळके आणि अमोल खुटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिक विलास कराळे आणि मादक मुस्ताक बेग यांनी आरोपीला पकडून ठेवले होते. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, तो तोतऱ्या आवाजात बडबड करून गैरवर्तन करू लागला. त्यानंतर जिल्हा शासकीय रुग्णालयात त्याची वैद्यकीय तपासणी केली असता, त्याने दारूचे सेवन केल्याचे निष्पन्न झाले.

यावरून पोलीस हवालदार प्रवीण खंडागळे यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे.

# बिंगो जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ७ जणांवर गुन्हा दाखल, पावणेदोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाईन जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. विजयलाईन चौकातील एका गाळ्यात ऑनलाईन पद्धतीने हार–जितीचा 'बिंगो' जुगार खेळवला जात होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या ठिकाणी कारवाई करत ७ जणांवर गुन्हा दाखल केला असून पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या छाप्यात पोलिसांनी विशाल पांडुरंग पठारे, विशाल राजू गायकवाड, प्रमोद प्रेमपाल ठाकूर, अमोल अशोक घुसा आणि मनिष बागूल यांच्यासह इतर साथीदारांवर गुन्हा नोंदवला आहे. यापैकी पांडुरंग त्रिंबक कुत्तरवाडे आणि रॉनी विंसेट स्वामी हे दोघे फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून संगणक संच, एलसीडी स्क्रीन, युपीएस, राऊटर, महागडे मोबाईल आणि रोख रक्कमेसह एकूण १ लाख ८१ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल के. एस. हरिश्चंद्रे करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### परिसर स्वच्छ ठेवा, आरोग्य जपा

स्वच्छ परिसर हा चांगल्या आरोग्याचा पाया मानला जातो. आपल्या घराची, शाळेची, कार्यालयाची आणि आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. स्वच्छ वातावरणात राहिल्याने शरीर निरोगी राहते, मन प्रसन्न राहते आणि अनेक संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते. त्यामुळे स्वच्छता ही केवळ सवय नसून ती निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. आजच्या काळात वाढते प्रदूषण, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि अस्वच्छ परिसर यांमुळे अनेक आजारांचे प्रमाण वाढत आहे. रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यामुळे दुर्गंधी पसरते आणि माशा, डास, उंदीर यांसारख्या रोगवाहक कीटकांची वाढ होते. यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया, टायफॉईड, कॉलरा, अतिसार अशा अनेक आजारांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे कचरा नेहमी कचरापेटीत टाकावा आणि ओला व सुका कचरा वेगळा करावा. घराच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नये. साचलेल्या पाण्यात डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. गटारे स्वच्छ ठेवावीत, पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा याची काळजी घ्यावी. शौचालये, स्नानगृहे आणि पिण्याच्या पाण्याच्या टाक्या नियमित स्वच्छ केल्यास रोगांचा प्रसार कमी होतो. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर कचरा टाकणे आणि प्लास्टिकचा अतिरेक वापर टाळणे हीदेखील प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्वच्छ परिसर म्हणजे निरोगी समाज हा संदेश प्रत्येकाने लक्षात ठेवला पाहिजे. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लहानपणापासूनच अंगीकारल्या, तर निरोगी, सुंदर आणि प्रदूषणमुक्त भारत घडविणे शक्य होईल. म्हणूनच परिसर स्वच्छ ठेवा, आरोग्य जपा हा संकल्प प्रत्येकाने मनापासून स्वीकारला पाहिजे.

## पाककला

### मसाला पनीर तवा रोल

**साहित्य :** पराठे ४, पनीर २५० ग्रॅम, कांदा १, ढोबळी मिरची १, टोमॅटो १, हिरव्या मिरच्या २, लसूण ६-७ पाकळ्या, आले १ इंच, दही २ चमचे, लाल तिखट १ चमचा, धणे-जिरे पूड १ चमचा, गरम मसाला १ चमचा, चाट मसाला १ चमचा, हिरवी चटणी २ चमचे, टोमॅटो सॉस २ चमचे, बटर २ चमचे, तेल २ चमचे, कोथिंबीर, मीठ चवीनुसार.

**कृती :** एका भांड्यात दही, लाल तिखट, धणे-जिरे पूड, गरम मसाला आणि मीठ घालून पनीर १०-१५ मिनिटे मुरवून ठेवा. कढईत तेल गरम करून त्यात लसूण, आले आणि हिरव्या मिरच्या परता. त्यानंतर कांदा, ढोबळी मिरची आणि टोमॅटो घालून २-३ मिनिटे परता. आता मुरवलेले पनीर घालून ५ मिनिटे शिजवा. शेवटी चाट मसाला आणि कोथिंबीर घालून मिश्रण तयार करा. पराठा तव्यावर बटर लावून दोन्ही बाजूंनी हलका भाजून घ्या. त्यावर हिरवी चटणी आणि टोमॅटो सॉस पसरवा. तयार पनीरचे मिश्रण ठेवून पराठा घट्ट रोल करा. पुन्हा तव्यावर थोडे बटर लावून रोल दोन्ही बाजूंनी खमंग व सोनेरी रंग येईपर्यंत भाजा. गरमागरम रोल हिरवी चटणी किंवा टोमॅटो सॉसबरोबर सर्व्ह करा. हा रोल नाश्ता, डबा किंवा संध्याकाळच्या अल्पोपहारासाठी उत्तम पर्याय आहे.

## वास्तू

### दुकानात माल असा साठवा

* वास्तूच्या पारंपरिक मान्यतेनुसार दुकान किंवा ऑफिसमध्ये माल साठवताना जड माल, मोठे बॉक्स आणि जास्त वजनाचा स्टॉक दक्षिण, पश्चिम किंवा नैऋत्य (दक्षिण-पश्चिम) भागात ठेवणे योग्य मानले जाते.

* ईशान्य (उत्तर-पूर्व) भाग शक्यतो मोकळा, स्वच्छ आणि हलका ठेवावा. दुकानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ मालाचा अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी, जेणेकरून ग्राहकांची ये-जा सहज होईल.

## सौंदर्य

जास्त प्रमाणात हेअर जेल वापरल्यामुळे केस कडक होतात आणि केस विंचरताना किंवा सेट करताना तुटण्याची शक्यता वाढू शकते. काही उत्पादनांमधील रसायनांमुळे टाळूवर खाज, जळजळ किंवा कोंड्याची समस्या निर्माण होऊ शकते.

## सल्ला

मीठ, मसाले, तेल, तांदूळ, डाळी, चहा-कॉफी यांसारख्या वस्तू सहज हाताला येतील अशा ठिकाणी ठेवा. वारंवार लागणाऱ्या वस्तूंसाठी वेगळा रॅक किंवा ड्रॉवर ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६

**कालाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, अश्विनी २१।१८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात प्रगती होईल. रखडलेली कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** व्यवसायात लाभ होईल. आरोग्याकडे लक्ष राहील.

**मिथुन :** नवीन संधी मिळतील. आर्थिक व्यवहार होतील.

**कर्क :** निर्णय लांबतील. कामाचा ताण जाणवेल.

**सिंह :** नोकरी-व्यवसायात संधी मिळतील. योजना यशस्वी होतील.

**कन्या :** मेहनतीला फळ मिळेल. आर्थिक व्यवहार होतील.

**तूळ :** व्यापारात वाढ होईल. नवीन ओळखी होतील.

**वृश्चिक :** घरात आनंद राहील. आर्थिक लाभ होईल.

**धनू :** नवीन करार होतील. प्रेमसंबंधात आनंद मिळेल.

**मकर :** खर्च वाढेल. परदेशी कामात प्रगती होईल.

**कुंभ :** उत्पन्न वाढेल. करिअरमध्ये संधी मिळतील.

**मीन :** सरकारी कामात यश मिळेल. व्यवसायात प्रगती होईल.

## शब्दगंध क्र. ७४८८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | | ४ | ५ | ६ |
| ७ | | ८ | | ■ | ९ | | |
| | ■ | १० | | ११ | ■ | ■ | |
| ■ | १२ | | ■ | १३ | | १४ | ■ |
| १५ | | | १६ | | ■ | | ■ |
| १७ | | ■ | | ■ | १८ | | १९ |
| | ■ | २० | | | | ■ | |
| २१ | | | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द :-** १) धातूला लागलेले कीट; पेटी; एक प्रकारचे उभट भांडे; जंग ३) अगदी गोल; वाटोळा ७) कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) ९) दिवस; दिन १०) भांडखोर (स्त्री) १२) एक धान्य; यव; सातू १३) एक रक्तशोषक किडा १५) मोजूनामापून; पुराव्यासह १७) एक प्रकारची तांबडी माती; गेरू १८) पुन्हा; परत; माघारा २०) नाजूक; सुकुमार; कोमल २१) सत्त्वयुक्त; सकस २२) सारखा; सम; बरोबर; पंचप्राणांपैकी एक

**उभे शब्द :-** १) एक नदी २) बस्तान ३) ऐट; नखरा ४) एक जंगली प्राणी; रानरेडा ५) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल ६) क्षणिक; पातळ; चंचल ८) गोंद वगैरे चिकट पदार्थ ११) वाद्यांचा मोठा आवाज १२) जमलेल्या लोकांचा समूह १४) वितरण; वाटणी १५) प्रकाशन करणारा १६) शशी; सोम; चंद्र १८) उत्तराधिकारी; हक्कदार १९) मालदार; धनवान; श्रीमंत २०) नेहमी; हमेशा; सतत

### शब्दगंध क्र. ७४८७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | मा | ■ | उ | पा | स | मा | र |
| स | मा | न | शी | ल | ■ | र | मा |
| ने | ■ | ■ | र | क | म | बा | र |
| पा | ऊ | स | ■ | ■ | न | ■ | मी |
| स | न | ■ | स | रा | स | री | ■ |
| ने | ■ | दा | ह | ■ | ब | स | ■ |
| ■ | घा | ■ | वा | य | दा | ■ | मै |
| स | म | र | स | ■ | र | च | ना |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** स्वप्न बघणं सोपं आहे, पण ते पूर्ण करण्यासाठी झोप सोडावी लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आवाज दिसत नाही तरी आपण तो कसा ओळखतो?

आपण रोज अनेक प्रकारचे आवाज ऐकतो. पक्ष्यांचा किलबिलाट, गाड्यांचा आवाज, माणसांचे बोलणे, संगीत, पावसाचा आवाज अशा अनेक गोष्टी आपल्या कानावर पडतात. पण एक प्रश्न नेहमी पडतो की, आवाज दिसत नाही तरी आपण तो ओळखतो कसा?

आवाज हा एक प्रकारची ऊर्जा आहे. जेव्हा एखादी वस्तू थरथरते किंवा कंपन करते, तेव्हा तिच्यामुळे आजूबाजूच्या हवेतील कणांमध्ये हालचाल निर्माण होते. ही हालचाल लहरींच्या रूपाने आपल्या कानापर्यंत पोहोचते. या लहरींना ध्वनीलहरी असे म्हणतात.

उदाहरणार्थ, आपण बोलतो तेव्हा आपल्या घशातील स्वरयंत्रात कंपन निर्माण होते. या कंपनांमुळे ध्वनी निर्माण होतो आणि तो हवेतून प्रवास करून दुसऱ्या व्यक्तीच्या कानापर्यंत पोहोचतो. आपल्या कानामध्ये एक पातळ पडदा असतो. ध्वनीलहरी कानात गेल्यावर हा पडदा कंपन करू लागतो. या कंपनांमुळे कानातील सूक्ष्म भाग सक्रिय होतात आणि ते संदेश मेंदूपर्यंत पोहोचवतात. मेंदू या संदेशांचे विश्लेषण करून आपल्याला आवाजाची जाणीव करून देतो. त्यामुळे आवाज दिसत नसला तरी आपण तो ऐकू शकतो आणि ओळखू शकतो.

वेगवेगळ्या वस्तूंच्या कंपनांमध्ये फरक असतो, म्हणून त्यांचे आवाजही वेगळे असतात. घंटीचा आवाज, ढोलाचा आवाज आणि माणसाचा आवाज हे एकमेकांपेक्षा वेगळे असतात. प्रत्येक व्यक्तीच्या आवाजातील कंपन वेगळे असल्यामुळे आपण एखाद्या व्यक्तीला न पाहताही तिचा आवाज ओळखू शकतो.

आवाजाला प्रवास करण्यासाठी हवा, पाणी किंवा घन पदार्थ यांसारख्या माध्यमांची गरज असते. मात्र ज्या ठिकाणी हवा नसते, तिथे आवाज प्रवास करू शकत नाही. म्हणूनच अंतराळासारख्या ठिकाणी आवाज ऐकू येत नाही.

आवाज दिसत नसला तरी त्याचा परिणाम आपण पाहू शकतो. मोठा आवाज झाल्यावर काही वस्तू हलू शकतात, पाण्यावर लहरी निर्माण होऊ शकतात किंवा काचेला कंपन जाणवू शकते. यावरून आवाजामध्ये शक्ती असल्याचे समजते.

थोडक्यात, आवाज स्वतः दिसत नाही कारण तो ध्वनीलहरींच्या रूपाने प्रवास करतो. या लहरी आपल्या कानापर्यंत पोहोचतात, कान त्यांना मेंदूपर्यंत पोहोचवतो आणि मेंदू त्यांचा अर्थ समजून आपल्याला आवाज ओळखायला मदत करतो. त्यामुळे अदृश्य असलेला आवाज आपण सहज ऐकू शकतो आणि समजू शकतो.


### मुळांची ताकद

एकदा एका शेतकऱ्यात खूप मोठा सफरचंदाचा बगीचा होता. त्यात एक झाड होतं ज्याला दरवर्षी भरपूर मोठी, लाल, रसाळ सफरचंद लागत असत. त्या झाडाजवळ एक लहान रोपटं होतं. ते रोपटं नेहमी मोठ्या झाडाला म्हणायचं,

काका, तुमच्यासारखी मोठी आणि गोड फळं मला कधी येतील? मोठं झाड हसायचं आणि म्हणायचं, अरे पिल्ला, घाई करू नको. आधी खोलवर मुळं रोव. ऊन, वारा, पाऊस सगळं सहन कर. मग एक दिवस तू पण अशीच फळं देशील. रोपट्याला ते पटत नव्हतं. त्याला वाटायचं लवकर फळं मिळावीत. म्हणून ते वरच वाढू लागलं. मुळं खोलवर न जाता फक्त फांद्या पसरवल्या. एक दिवस जोराचा वारा आला. सगळी झाडं डोलू लागली. खोल मुळं असलेलं मोठं सफरचंदाचं झाड स्थिर राहिलं. पण वरवर वाढलेलं ते लहान रोपटं मुळापासून उखडून पडलं. नंतर शेतकऱ्याने नवीन रोप लावलं. यावेळी ते रोपटं रोज पाणी घ्यायचं, मेहनत करायचं आणि हळूहळू खोलवर मुळं रोवायचं. काही वर्षांनी त्यालाही मोठी गोड सफरचंदं लागली.

बोध : जीवनात पटकन यश हवं म्हणून वरवरचा चकचकीतपणा नको. आधी स्वतःचा पाया मजबूत करा - शिक्षण, मेहनत, चारित्र्य. मुळं खोल असतील तरच वादळातही टिकता येतं आणि गोड फळं मिळतात.

## आत्मशक्ति



आत्म्यापुढे भीती नाहीशी होईल.असाच अभ्यास व सराव इतर भीतीबाबत अवलंबावा व छोट्या भीती दूर करण्याच्या प्रक्रियेपासून सुरुवात करून मोठमोठ्या भीती दूर करत चला. जर आपण चैतन्यशील आत्म्याशी जोडले गेलो तर स्थायी शांती आणि निर्भयता प्राप्त कराल.ह्या संदर्भात एक गोष्ट सांगितली जाते.एक मनुष्य हिंस्र वाघापासून संरक्षण व्हावे म्हणून पळत होता. पळता पळता तो एका उंच्या खडकाजवळ पोहोचला. तेथून पुढे तो पडू शकत नव्हता. खाली पाहिले तर तेथे एका झाडाची फांदी होती. उडी मारून तिला पकडल्याशिवाय त्याचा वाघापासून बचाव होणार नव्हता. जोपर्यंत वाघ येत नाही तोपर्यंत त्या फांदीवर लटकत राहू असा त्याने विचार केला. पण नंतर एक छोटा उंदीर त्या फांदीला कुरतडत आहे, हे पाहिल्यावर तो अत्यंत भयभीत झाला. खाली तर

### निर्भयता

खूपच खोल दरी होती! वर वाघ आणि खाली दरी! काही सुचेनासे झाले.तेव्हा तो परमेश्वराची प्रार्थना करू लागला की, 'आपण सांगाल तसे मी करीन. कृपा करून मला मदत करा!' परमेश्वराने म्हटले की, 'मी सांगतो तसे तू करावेस!' तो मनुष्य खूप भयभीत झाला होता. तो म्हणाला, 'होय परमेशा, माझे रक्षण करा.' परमेश्वराने म्हटले, 'ठीक आहे, तू ह्या फांदीला सोडून दे, मी तुझे रक्षण करील!'त्या माणसाने क्षणभर विचार केला. तो म्हणाला, 'वर आपल्यापेक्षाही (अधिक बलशाली) कोणी दुसरा आहे का ? की ज्याच्याशी मी, मला वाचविण्यासाठी बोलू शकेन!'आपल्यालाही असेच वाटते, परमेश्वराने आपणांस वाचवावे. पण आपण सारे काही त्याच्यावर सोडीत नाही. त्याच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. आत्मा व परमात्मा एकरूप आहेत. जागृत आत्मा आम्हाला मदत करतो. आयुष्यातील अडचणींना तोंड देण्यासाठी त्याची मदत होते. पण त्यासाठी आम्ही आमचा अहंकार आणि चतुराई (लवाडी) सोडली पाहिजे. हा निर्भय आत्म्याला संकटांशी सामना करू द्यावा.तेव्हा आम्हाला स्पष्ट होईल की आमचे जीवन विश्वास, संरक्षण, निश्चितपणा आणि आपलेपणाने भरून जाईल. आम्ही निर्भय बनून आपल्या मार्गाने चालायला स्वतंत्र होऊ.पान ६ एकताजेव्हा सर्वसाधारण लोकांसाठी संगणक उपलब्ध झाला तेव्हा त्याच्या वापरासाठी सर्वजण उतावळे झाले होते.परंतु गेल्या काही वर्षांत तंत्र विज्ञानाने त्याहूनही अधिक यश मिळविले. आता आम्ही एक छोटासा संगणक टेबलावर वा मांडीवर ठेवून त्याद्वारे इतर संगणकांशी संपर्क साधून त्यांच्यामध्ये असलेले उपलब्ध ज्ञान मिळवू शकतो. संगणकावरून आम्ही प्रत्येक क्षेत्रातली माहिती उदा.बातम्या, भागाभांडवल बाजार, विमान तिकिट आरक्षण, घरात बसून खरेदी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

ते सगळे मागे सोडतो. पण त्याने केलेली कर्मे, निर्माण केलेली कार्मिक खाती, संस्कार हे त्याच्या बरोबर प्रवास करतात. बहुधा आत्म्यासाठी मृत्यू खूप वेदनादायी असतो कारण, त्या आयुष्यात त्यांनी जे काही मिळवले असत - शरीर, कुटुंब आणि यश - हे सगळे त्यांना नाइलाजाने मागे सोडावे लागते. त्यामुळे मागच्या जन्मातले शरीर नुकतेच सोडलेला आत्मा शक्ती, दुःखात असतो. काही आत्म्यांना थोडे जास्त झगडावे लागते, कारणी कमी. जर कोणाला अकाली मृत्यू झाला किंवा एखाद्या अपघातात शरीर सोडावे लागले किंवा एखादा आत्म्याला त्या आयुष्यात जे मिळवायचे होते ते शेवट झाले नसेल तर त्या आत्म्याला खूप वेदना होतात. म्हणून, जे आईवडील होणार आहेत त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांच्या कुशीत येणार नवीन सदस्य ही त्यांच्यासाठी आनंदाची बाब असते पण जो आत्मा त्या मूल म्हणून जन्माला येणार आहे तो वेदनेत

### आत्म्याच्या वेदना

आहे.

त्या आत्म्याच्या वेदना कमी करण्यासाठी त्या आयुष्यात प्रेमाची, शांतीची आणि स्वास्थाची भरपूर ऊर्जा देणे ही आईवडील म्हणून त्यांची जबाबदारी आहे. नाही तर, जर नवीन कुटुंबाकडून वेदना मिळाला तर त्या वेदनामुळे आत्म्याच्या वेदनांमध्ये भर पडेल.गरजेर क्षीण कोणालाही प्रकारचा ताण घेणे, काळजी करणे, भीती बाळगणे परवडणार नाही कारण त्याचा परिणाम थेट उत्पन्नावर आईबाबा होतो.

कुटुंबातील इतर सदस्यांही त्या आत्म्यावर परिणाम होतो. पण आईचा परिणाम थेट होतो. म्हणून, गर्भधारणेच्या खालील काळात चित्रे लावण्यात हरकत नाही. चिंते घालवी प्रेरणादायक पुस्तके वाचायला हवीत. जेणेकरून तिचे विचार शुद्ध आणि शक्तिशाली बनतील.मी असा एका स्त्रीला भेटलो आहे जिचे गर्भधारणातून नुकते महिले आणि त्यानंतरच्या वर्षी कायद्याचे करण्याचे गेले कारण तिच्या कायद्यात तिची आई कॅन्सरच्या शेवटच्या स्थितीत होती. आता तिच्या मुलगा १८ वर्षाचा आहे आणि आजही भीती आणि काळजी ही त्याच्या प्रमुख भावना आहेत. त्याला हा भावना त्याच्या आईकडून मिळाल्या आहेत तो खूप अधिक अस्वस्थ होता आणि नियतकाळून मिळालेल्या स्टड्याच्या बाधितातून मुक्त झाला होता.आज, गर्भधारणा बाळाला बाळाच्या मातृत्वातील चांगले खायला सांगतात. व्यवस्थित व्यायाम करायला सांगतात. पण चांगला विचार करायला कोणाच सांगत नाही. होणाऱ्या आईने फक्त बाळाच्या तब्येतीसाठीच नाही तर तिच्या विचारपद्धती भविष्यात बाळाची विचारपद्धती असणार आहे म्हणून चांगला विचार केलाच पाहिजे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको :** ऐका, मी गेल्यावर तुम्ही दुसरं लग्न कराल का?
**नवरा :** नाही गं.
**बायको :** म्हणजे माझ्यावर एवढंच प्रेम?
**नवरा :** तसं नाही... एकदाच झालेली चूक पुन्हा कशाला करू!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील सर्वात उंच शिखर कोणते?

- कांचनजुंगा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### शूकधान्य

शूकधान्य म्हणजेच एकदल धान्य होय. ज्या धान्याचे दोन भाग होत नाहीत. पूर्णतः एकेरी असणाऱ्या धान्याला एकदल धान्य असे म्हणतात. आहारीय पदार्थांमध्ये हे धान्य एक प्रमुख अन्नघटक म्हणून वापरले जाते. यामध्ये गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ, नाचणी, मका, ओट, जव (बार्ली) या धान्यांचा समावेश होतो. धान्य म्हणजे प्रत्येक विशिष्ट वनस्पतीचे बी असते. आकाराने लहान, टणक आणि सुक्या बियांचे दाणे धान्य म्हणून वापरले जाते. बहुतेक सर्व धान्ये ही गवती कुटुंबातील असून, शास्त्रीयदृष्ट्या त्यांचे नाव 'ग्रॅमिनीज' असे आहे. हे धान्य साफ करून त्याचे पीठ करून त्यापासून भाकरी, पोळी, थालीपीठ, पराठा असे विविध प्रकार बनवून जेवणामध्ये घेतले जातात. या धान्याची लागवड इतिहासपूर्व काळापासून जगभर केली जाते. ख्रिस्तपूर्व १०,००० वर्षांपासून साधारणतः धान्याची लागवड केली जात असावी. हे धान्य टिकाऊ असते. सुकाविल्यानंतर अनेक वर्षे धान्य टिकते. त्याला एक विशिष्ट चव व स्वाद असतो. औषधी गुणधर्म : सर्व धान्यांमध्ये कोंडा, धान्याची साल, त्याच्या आतील दाणा असे महत्वाचे घटक असतात. या सर्व घटकांमध्ये औषधी गुणधर्म असतात. प्रथिने, पिष्टमय पदार्थ, स्निग्धता, जीवनसत्त्वे, खनिजे, कॅल्शिअम, लोह, तंतुमय व पिष्टमय पदार्थ असे अनेक महत्त्वपूर्ण घटक असतात. सहसा सर्व धान्ये पिष्टमय पदार्थांनी (कार्बोहायड्रेट्स) समृद्ध असतात. यामध्ये पिष्टमय पदार्थांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजेच ७०% असते. कोंडा न काढलेल्या धान्यांतून कॅल्शिअम व लोह मिळते. म्हणूनच पीठ दळून आणल्यानंतर ते न चाळता त्याची भाकरी किंवा पोळी बनवावी. अनेकजण पीठ चाळून त्याची पोळी किंवा भाकरी बनवितात. परंतु शरीराला आवश्यक असणारे अन्न व औषधी घटक हे जास्त प्रमाणात कोंड्यातच असतात. तसेच कोंड्यामध्ये जास्त प्रमाणात फायबर असल्यामुळे आतड्यांमध्ये साचलेला मल पुढे ढकलण्यास मदत होऊन शौचास साफ होते. धान्यांची पौष्टिकता, जीवनसत्त्वे व प्रथिने यांचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना मोड आणावेत. सर्व धान्यांना मोड आणले असता त्यामध्ये 'क' जीवनसत्त्व, 'इ' जीवनसत्त्व वाढते. त्यामुळे धान्य हा परिपूर्ण आहार होऊ शकतो, म्हणून शक्य असल्यास प्रत्येक धान्याला मोड आणून ते वाळवावे. त्यानंतर त्याचे पीठ करून भाकरी किंवा पोळी बनवावी. समतोल परिपूर्ण आहारासाठी पिष्टमय पदार्थांचा खजिना असलेल्या या एकदल धान्यांबरोबर इतर पौष्टिक घटक उदाहरणार्थ, खनिजे, प्रथिने, जीवनसत्त्वे, लोह, कॅल्शिअम मिळविण्यासाठी दूध, फळे, पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्ये, सुकामेवा यांचा आहारात समावेश करावा. धान्यामध्ये असलेल्या पिष्टमय पदार्थांमुळे आरोग्य नक्कीच चांगले राहते. या पिष्टमय पदार्थांमुळे स्नायूंची जडणघडण प्राकृत होते. तसेच रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्ज्ञा, शुक्र या सर्वच धातूंचे पोषण योग्य प्रमाणात होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



एक हसीना थी संगीत मैफिलप्रसंगी पवन नाईक, सुहासभाई मुळे, आनंद काळकोंडे, सुरज सय्यद, जयद्रथ खाकाळ, डॉ. के. एच. धारानी, डॉ. दमन काशीद, राजकुमार गुरनानी, ॲड. गुलशन धारानी, अमीन धारानी आदी.

# ‘एक हसीना थी’ संगीत व सामाजिक बांधिलकीचा नगरमध्ये अदभुत मिलाफ

नगर – अमीन धारानी प्रस्तुत एक हसीना थी या सुरेल आणि भावस्पर्शी हिंदी गाण्यांच्या मैफिलीचा अप्रतिम सोहळा डीसीबी बँकेच्या सहकार्याने माऊली सभागृहात पार पडला. संगीत आणि सामाजिक भान यांचा एक अत्यंत सुंदर मिलाफ या कार्यक्रमाच्या रूपाने नगरकरांना अनुभवायला मिळाला.

गाता रहे मेरा दिल ग्रुपतर्फे डीसीबी बँकेच्या सहकार्याने आयोजित या मैफलीचे प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय सुफी सिंगर पवन नाईक, संगीत तज्ञ सुहासभाई मुळे, डीसीबी बँकेचे रिजनल हेड आनंद काळकोंडे, डीसीबी बँकेच्या नगर शाखा ब्रांच मॅनेजर सुरज सय्यद, एमआयडीसी आमी संस्थेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, डॉ. के. एच. धारानी, प्रसिद्ध सर्जन आणि संगीत प्रेमी डॉ. दमन काशीद, संगीतप्रेमी राजकुमार गुरनानी, ॲड. गुलशन धारानी आदी उपस्थित होते. डीसीबी बँकेचे आनंद काळकोंडे व सुरज सय्यद यांच्या हस्ते मैफलीचे दिपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी समाजातील गरजू व दुर्लक्षितांसाठी नियमित कार्यरत असलेल्या संध्या मेढे, खाकाळ यांचा सन्मान करण्यात आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचा खरा आत्मा आणि कौतुकास्पद बाब म्हणजे अमीन धारानी यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी! त्यांनी नगरमधील अनाम प्रेम या संस्थेतील अंध मुले–मुली तसेच समाजातील दुर्लक्षित, तरीही उच्च दर्जाच्या कलाकारांना हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अमीन धारानी स्वतः गायक आहेतच, पण स्वतःच्या कलेसोबतच इतर प्रतिभावंत कलाकारांना मुख्य प्रवाहात आणण्याचे औदार्य त्यांनी दाखवले.

कार्यक्रमाची दणकेबाज आणि मंत्रमुग्ध करणारी सुरुवात अमित बारवा यांनी आपल्या सॅक्सोफोनच्या जादूई सुरावलींनी केली. त्यांनी सॅक्सोफोनवर दिल क्या करे जब किसी से प्यार हो जाये हे व अनेक लोकप्रिय गाणी ज्या नजाकतीने आणि मोहिनीने वाजवून दाखवली, त्याने पहिल्याच क्षणी उपस्थितांची मने जिंकून घेतली. या मैफिलीत पल्लवी खरात यांनी आपल्या सुरेल आणि प्रगल्भ गायकीने संपूर्ण सभागृह जिंकून घेतले. दिल्लगी ने दी हवा आणि कार्यक्रमाचे शीर्षकगीत असलेल्या एक हसीना थी या गाण्यांमधून त्यांनी दिलेली साथ अत्यंत अप्रतिम आणि लाजवाब होती.

या कार्यक्रमातील सर्वात भावूक आणि अंगावर काटा आणणारा क्षण म्हणजे अंध कलाकार गौरी इंगळे हिचे सादरीकरण. तिने जेव्हा फकीरा चित्रपटातील दिल में तुझे बिठा के, कर दूंगी बंद आंखें हे गाणे गायला सुरुवात केली, तेव्हा संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले. स्वतःच्या दोन्ही डोळ्यांत अंधार असताना तिने ज्या भावपूर्णतेने आणि आर्ततेने बंद डोळ्यांचे हे गाणे गायले, ते थेट काळीज चिरून गेले. सभागृहात प्रेक्षकांनी वन्स मोअरचा एकच जल्लोष केला आणि टाळ्यांच्या गजराने संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले.

प्रतिभा काळे यांनी सूत्रसंचालन केले. उद्योजक आणि सुरेल गायक हेमंत नरसाळे यांनी कभी बेकसी ने मारा, खुल्लम खुल्ला प्यार करेंगे व इतर गाणी गाऊन संगीतावरील आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली. तसेच अमीन धारानी आणि गुलशन धारानी यांनी जीवन के हर मोड पे व जाने जा ढूंढता फीर रहा यांसारखी सदाबहार गाणी सादर करून रसिकांची वाहवाही मिळवून मंत्रमुग्ध केले. याशिवाय अजित माने, चंदर ललवानी, वंदना जंगम आणि अनाम प्रेमच्या विद्यार्थ्यांनी जिंदगी मौत ना बन जाये या गाण्यासह संपूर्ण संध्याकाळ संगीतमय करून टाकली. अमीन धारानी यांनी १० गीते सादर करुन रसिकांची उत्सुकता शेवटपर्यंत दुर केली.व कार्यक्रमाची उत्सुकता शेवटपर्यंत टिकून ठेवली. कार्यक्रमाचे व्यवस्थापन ॲड. गुलशन धाराणी यांनी उत्तमरित्या पार पाडले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## प्रकाशाच्या अनुयायांचे मार्ग मोकळे

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स

झंजुमुंजू होताच झोप सोडावी, आरोग्यसंपत्ती जोडावी. पहाटे उठण्याचे फायदे ऋग्वेद सांगतो.

मानवांनो, उठा. प्राणच आलेत प्रत्यक्ष, भेदून मृत्यूचा अंधार. घ्या भरभरून हृदयात ते प्राण. निष्प्राण पडलो होतो रात्रभर, अंधारापायी डोळे मिटून नव्हती चेतना, संवेदना, फक्त होत्या वेदना मनाला, की हा अंधार आयुष्याचा करतो चोळामोळा. आता उगवले नारायण, करा प्राण गोळा. सुर्याने सगळे मार्ग मोकळे केले आहेत. प्रगतीचे, समृद्धीचे. जे अवरुद्ध केले होते अंधाराने. नवे प्राण, नवी जाण, संपले निराशांचे ताण, आता गवसली सुखसमृद्धीची खाण. सुर्योदय नव्हे, उदय तुझ्या भाग्याचा. उठ, घे लाभ या सुवर्णसंधीचा.

तुकोबाही म्हणतात,

उठा उठा हो सकळ जन। उठिले नारायण।
आनंदले मुनिजन। तिन्ही लोका।।

नार म्हणजे जीवन ते घेऊन अयन करणारा, फिरणारा हा नारायण उदयाला आला आहे. प्राणच प्राण पसरले आहेत किरणांतून घ्या हवे तेवढे प्राण वेचून. मनोर्हिताय मुनिः। माणसांचे कल्याण करतात त्यांना मुनि म्हणतात. ते आनंदित झाले आहेत. कारण लोककल्याण करायला मिळाला आहे. लोक म्हणजे अवस्था, असे आद्य शंकराचार्य म्हणतात. बाल, तरुण व वृद्ध या तिन्ही अवस्थेतील लोकांना आनंद झाला आहे.




प्रकाश हाती घेऊन अंधार घालविता येईल. पण अंधार मुठीत घेऊन प्रकाशाला मुठमाती देण्याचे जमले आहे कोणाला ?

एकाने आपल्या तीन मुलांना सांगितले, ही खोली रिकामी आहे, ती पूर्ण भरा. जो तशी भरेल त्याला माझी संपत्ती मिळेल. पहिल्या मुलाने दारेखिडक्या बंद केल्या. खोलीत खच्चून कापूस भरला, पण जागा उरलीच. कापूस दाबला, मोकळी जागा दाखवून गेला. दुसऱ्यानेदेखील दारेखिडक्या बंद केल्या. धान्यांची रास लावली. दाणे सरकले, जागा मोकळी करुन गेले. तिसऱ्याने काहीही केले नाही. वडील पाहायला आले, तर त्याने उलट खोलीच्या खिडक्या व दारे उघडली आणि पाहा, खोली भरली की नाही, असे वडिलांना विचारले, वडील म्हणाली खोली भरली ? कशानं भरली ? मुलगा म्हणाला, प्रकाशानं वडिलांची संपत्ती त्या तिसऱ्याला मिळाली.

प्रकाश सर्वत्र जातो. अणुरेणू व्यापतो. त्याला कोठेही अविरोध नाही. प्रकाशाच्या अनुयायांनाही असाच कोठेही विरोध नाही. त्याचेचही सगळे मार्ग मोकळेच. म्हणून सुर्योपासना महत्वाची. ऋग्वेद म्हणतो, उगवत्या सुर्याची किरणे डोळ्यांतून हृदयात साठवा, हृद्रोग घालवा.

सुर्यकिरणपान हे अमृतपान होय. समर्थ म्हणतात. सर्वत्र रमतो तो राम, तो सुर्यावतार राम. सुर्यकुळातला राम, प्रभाते चिंतावा.

– किशोर गांधी

# पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – मराठी भाषा आणि साहित्यात उल्लेखनीय संशोधन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राकडून विद्यार्थ्यांच्या विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते संशोधक विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, शाल, पेन देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, डॉ. पारस कोठारी, प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांनी यशवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

डॉ. वैदही गायकवाड यांनी महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांचा सांस्कृतिक अभ्यास, डॉ. संगीता फासाटे यांनी साठोत्तरी ग्रामीण कवितेचा गेय आविष्कार : एक अभ्यास, डॉ. मंदा हाडवळे यांनी २००० ते २०२० मधील कलावंतांच्या निवडक आत्मचरित्रांचा अभ्यास (साहित्य, चित्रपट, नाट्य, नृत्य, संगीत,



पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयात प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

चित्रकला या क्षेत्रांच्या संदर्भात), डॉ. सुनीता लोंढे यांनी अनुबंध नियतकालिकातील कथांचा विवेचक अभ्यास, डॉ. सुनीता दुधाट यांनी निवडक मराठी लेखिकांच्या ललित गद्याचा आदिबंधात्मक अभ्यास, डॉ रूपाली ढमढेरे यांनी दीनमित्रमधील अग्रलेखांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास, डॉ. राहुल शेलार यांनी द. मा. मिरासदार व शंकर पाटील यांच्या ग्रामीण व विनोदी कथात्मक साहित्याचे स्वरूप आणि चिकित्सा, डॉ. सोनाली शिंदे यांनी गोपाळ गणेश आगरकर विषयक मराठीतील चरित्रपर लेखनाचा अभ्यास अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी संशोधन केले आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून, समृद्ध संस्कृतीचा पाया आहे. आजच्या डिजिटल युगात मराठी साहित्यात उच्च दर्जाचे संशोधन होणे काळाची गरज आहे. नवीन विद्यावाचस्पतींनी केलेले हे कार्य मराठी भाषेला अधिक समृद्ध करेल. सारडा महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्रातून विद्यार्थी विविध नाविन्यपूर्ण विषयांवर, आंतरविद्याशाखीय संशोधन करीत आहेत, ही अभिमानाची बाब आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. मंदा हाडवळे, डॉ. सुनीता लोंढे, डॉ. राहुल शेलार, डॉ.सोनाली शिंदे या गुणवंत संशोधक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

# गांधी मैदान येथील मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथ.विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

नगर – येथे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रेरणादायी सोहळ्यास अहिल्यानगरचे प्रति लोकमान्य मा. बाळासाहेब लांडे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते, तर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नराल मॅडम यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा सविस्तर आढावा घेतला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची बहुमूल्य माहिती मिळाली.

प्रमुख पाहुणे मा. बाळासाहेब लांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थी दशेत वाचनाचे महत्त्व आणि अभ्यासाचे महत्त्व विशद केले. तसेच देशाचे उत्तम नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणती मूल्ये अंगीकारली पाहिजेत यावर विचार मांडले. निरोगी जीवनासाठी नियमित व्यायाम आणि चांगल्या आरोग्यदायी सवयींचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारा आणि त्यांच्यामध्ये देशभक्तीची व प्रेरणा निर्माण करणारा ठरला.

# वक्तृत्व स्पर्धांमध्ये सेंट विवेकानंद स्कूलची भरारी

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध वक्तृत्व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कोपरगाव येथील शारदा इंग्लिश मीडियम स्कूल आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत एकूण ३३ शाळांचे ६६ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातून शाळेच्या पूर्वा संतोष पवार व रिशिता किशोर ढवळे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिकासह प्रत्येकी १ हजार रुपयाचे रोख बक्षीस मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांना मराठी विभाग प्रमुख सीमा कोटस्थाने व इतर मराठी विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. आतापर्यंत प्रत्येक स्पर्धेत शाळेने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळवलेले आहे.

तसेच श्रीरामपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत अमोघ समीर पळसकर व अपूर्वा सागेर नांदुरकर यांनी उत्तेजनार्थ पारितोषिकासह प्रत्येकी ५०० रुपयांचे रोख बक्षीस प्राप्त केले. त्यांना इंग्लिश विभाग प्रमुख शिरीन शेख व इतर इंग्लिश विषय शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. सतत २१ वर्ष सहभाग नोंदवत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत शाळेने दैदीप्यमान कामगिरी केलेली आहे.




सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध वक्तृत्व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

या सर्व स्पर्धांसाठी शाळेच्या प्राचार्य गीता तांबे विद्यार्थी व शिक्षक यांना सतत मोलाचे मार्गदर्शन देऊन प्रोत्साहन देत असतात.

याचबरोबर गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या विशेष कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी शिक्षिका मीता कराचिवाला व माता पालक तेहरीन खान उपस्थित होत्या. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून त्यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गीत, भाषणे, गुरुवंदना तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे व आयोजनाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तसेच गुरुपौर्णिमा कार्यक्रमाबद्दल शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कंचन पापडेजा, शिक्षकवृंद, सहकारी कर्मचारी व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या समारंभास संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा तसेच विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेश मध्यान उपस्थित होते.



सावेडीतील शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला.

# सावेडीत संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त हरिनाम सप्ताहास प्रारंभ

नगर – सावेडीतील शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. सप्हाहाचे हे ३७ वे वर्ष असून, हा सप्ताह १० ऑगस्टपर्यंत चालणार आहे. सप्ताहाचे उद्घाटन नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगरसेविका वंदनाताई ताठे, अशोकराव वाकळे, ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे, उपाध्यक्ष विजय काकडे, सचिव राजू बगाडे, सहसचिव सुधीर नेवासकर, खजिनदार कृष्णा भस्मे, दिलीप काकडे, राजू पाटकुले, उद्धवराव बारटक्के, महेश चौकटे, विठ्ठल वनारसे, प्रमिला दुमाटे, हेमलता वडे, लक्ष्मी पाटकुले, क्रांती काकडे, वंदना काकडे, शितल चौकटे, सुधीर काकडे, चंद्रकांत काकडे, राजू लिमकर, सौदागर सदावर्ते, निलेश चौकटे, चंद्रकांत कल्याणकर, किरण उरुणकर, शौनक वनारसे, अभिषेक पाटकुले, ओंकार चौकटे, प्रमोद गोंदकर, शिवाजी बोंडगे, किसनराव पेहेरे, दत्तात्रय वनारसे, सार्थक काकडे, उपळे भागवत आदी उपस्थित होते.

नगरसेविका बोरुडे म्हणाल्या, साधू–संताच्या आशिर्वादाने समाजात प्रेम, बुद्धी, सहिष्णुता, सात्विकता वृद्धींगत होण्यासाठी संतांनी आपले आयुष्य सत्कार्णी लावले. समाजाला सर्वांपूर्ण, संस्कारक्षम व बलशाली होण्यासाठी नामयज्ञाचे महत्व आहे. नामदेव शिंपी समाज ट्रस्टने धार्मिक क्षेत्रात दिलेले योगदान हे महत्वपूर्ण असेच आहे. या सोहळ्याने सर्वांच्या जीवनात सुख–शांती–समाधान लाभणार आहे. तसेच संत नामदेव महाराजांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे त्यांनी सांगितले.

सावेडीतील शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड सप्ताहाचे उद्घाटन नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे यांनी सांगितले, संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सात दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात विविध किर्तनकरांची किर्तन आयोजित केली आहे. तसेच वर्षभर ट्रस्टच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. समाजातील गणुवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात यश मिळविणार्या व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो, असे त्यांनी सांगितले.

उपाध्यक्ष विजय काकडे यांनी प्रास्तविक केले. ते म्हणाले, आजपासून सात दिवस विविध किर्तनकरांची किर्तने आयोजित केली आहे. तसेच ९ ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजता दिंडी मिरवणूक होईल. १० ऑगस्ट रोजी काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाचा समारोप होणार आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. यावेळी राजेंद्र बगाडे, नगरसेविका वंदना ताठे यांनीही मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन दिलीप काकडे यांनी केले. आभार कृष्णा भस्मे यांनी मानले. स्वागत सुधीर नेवासकर यांनी केले. कार्यक्रमास नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, युवक वर्ग, महिला मंडळ आदी उपस्थित होते.

# फॅसिझमचा पराभव संविधानिक विचारानेच होईल

## डॉ. भालचंद्र कांगो यांचे प्रतिपादन; प्रगतिशील लेखक संघाच्या सहाव्या राज्य अधिवेशनाचा समारोप

नगर – भारतात पसरलेला धर्माधिष्ठित फॅसिझमचा पराभव करायचा असेल तर संविधानाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी लेखकांनी सामाजिक भान ठेवून जबाबदारीने लेखन करणे आवश्यक आहे. सर्व कम्युनिस्ट चळवळी बरोबरच लोकशाहीवादी लोकांना एकत्र आल्याशिवाय धर्मांध शक्तींचा पराभव करता येणार नाही. लेखकांनी प्रगतिशील असले पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांनी केले.




प्रगतिशील लेखक संघाच्या सहाव्या राज्य अधिवेशनाच्या समारोप समारंभात बोलताना डॉ. भालचंद्र कांगो.

प्रगतिशील लेखक संघाच्या वतीने अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित सहाव्या राज्य अधिवेशनाच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कांगो बोलत होते.

कांगो म्हणाले, आताच्या काळात जे अशक्य वाटत होते, ते तरुणाईने दिल्लीमध्ये शक्य करून दाखवले आहे. जेन झीच्या नव्या पिढीतील मुले–मुली धर्मांध शक्तींच्या विरोधात उभे आहेत. सोशल मीडियावर ते सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारत आहेत. हीच नव्या क्रांतीची सुरुवात आहे. नव्या पिढीने सोशल मीडियाचा वापर करून मुख्य प्रवाहातील माध्यमांची मक्तेदारी संपवली आहे. प्रगतिशील लेखक संघाने आता या तरुणांना एकत्र घेऊन काम केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी राज्य कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. अध्यक्षपदी प्रसिद्ध लेखक जी. के. ऐनापुरे तर महासचिवपदी प्रसिद्ध कादंबरीकार राकेश वानखेडे यांची फेरनिवड करण्यात आली. समारोप प्रसंगी ॲड. कॉ. बन्सी सातपुते, दिवाकर कृष्णा आचार्य कॉ. नीलिमा बंडेलु, साहित्यिक डी. जी वाघ, जी. के. ऐनापुरे यांनीही मनोगत व्यक्त केले. राकेश वानखेडे यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. बापू चंदनशिवे यांनी सूत्रसंचालन केले. स्वागताध्यक्ष ॲड. सुभाष लांडे यांनी आभार मानले. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी ॲड. विद्या शिंदे, डॉ. श्याम शिंदे, डॉ. श्रीकांत काळोखे, कवयित्री सरोज आल्हाट, ज्ञानदेव पांडुळे, तानाजी सावळे, रियाज शेख, विवेक कसबे यांनी परिश्रम घेतले.

# भिंगारच्या शुक्लेश्वर स्मशानभूमीच्या दुरुस्तीला सुरुवात

## जालिंदर बोरुडे यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्याची प्रशासनाकडून दखल



भिंगारच्या शुक्लेश्वर स्मशानभूमीच्या दुरुस्तीला सुरुवात झाली असून त्याची पाहणी करताना जालिंदर बोरुडे.

नगर – भिंगार येथील ऐतिहासिक शुक्लेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीच्या अत्यंत दयनीय अवस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर छावणी प्रशासनाने तातडीने दखल घेत दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. जीर्ण झालेले पत्र्याचे शेड, तुटलेल्या जाळ्या, पडझड झालेला प्रवेशद्वार आणि अन्य सुविधांची दुरुस्ती सुरू करण्यात आली आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या दुरुस्तींवर समाधान न मानता, अहिल्यानगर शहरातील नालेगाव येथील अम रधामच्या धर्तीवर आधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज आरसीसी स्मशानभूमी उभारण्याची मागणी बोरुडे यांनी केली आहे.

भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर परिसरातील ही स्मशानभूमी भिंगारसह पंचक्रोशी आणि नागरदेवळे उपनगरातील हजारो नागरिकांच्या अंतिम संस्कारासाठी महत्त्वाचे केंद्र आहे. दररोज अनेक अंत्ययात्रा येथे येत असतात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या स्मशानभूमीची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. अंत्यविधीसाठी उभारण्यात आलेले पत्र्याचे शेड पूर्णपणे जीर्ण झाले होते. अनेक ठिकाणी मोठमोठी भगदाडे पडल्याने पावसाळ्यात शेडमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळत होते. परिणामी, दुःखद प्रसंगीही नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

पावसाच्या दिवसांत अंत्ययात्रा स्मशानभूमीत पोहोचल्यानंतरही पाऊस थांबेपर्यंत मृतदेहासह नातेवाईकांना प्रतीक्षा करावी लागत होती. अंत्यविधीची प्रक्रिया सुरळीत पार पाडणे अशक्य होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. याशिवाय प्रवेशद्वाराचे लोखंडी गेट मोडकळीस आले होते, बसण्यासाठीचे ओटे वरील जाळ्या तुटलेल्या होत्या आणि परिसरात आवश्यक मूलभूत सुविधांचाही अभाव जाणवत होता.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी जालिंदर बोरुडे यांनी छावणी प्रशासनाचे लक्ष वेधून निधी उपलब्ध करून दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी केली होती. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्यांच्या या भूमिकेनंतर छावणी प्रशासनाने त्वरित दखल घेत आवश्यक दुरुस्तीची कामे सुरू केली. सुरू असलेल्या कामांची पाहणीही जालिंदर बोरुडे यांनी प्रत्यक्ष जाऊन केली. बोरुडे यांनी प्रशासनाच्या तातडीच्या कारवाईचे स्वागत करताना, ही केवळ तात्पुरती उपाययोजना असल्याचे स्पष्ट केले. दरवर्षी पत्र्याचे शेड बदलणे किंवा डागडुजी करण्याऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### नगर अमरधामच्या धर्तीवर आधुनिक स्मशानभूमीची मागणी

भिंगारमधील शुक्लेश्वर स्मशानभूमी ही हजारो नागरिकांच्या अंतिम संस्कारासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने तिचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. अहिल्यानगरच्या नालेगाव येथील अमरधामच्या धर्तीवर या ठिकाणी पूर्णपणे आरसीसी बांधकाम असलेली, प्रशस्त आणि आधुनिक सुविधा असलेली स्मशानभूमी उभारावी, अशी मागणी जालिंदर बोरुडे यांनी केली आहे. त्यासाठी स्वतंत्र निधी मंजूर करून मजबूत आरसीसी शेड, बसण्यासाठी प्रशस्त ओटे, सुरक्षित प्रवेशद्वार, स्वच्छ परिसर, पिण्याच्या पाण्याची सुविधा, प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.



पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्यानंतर तेजस्विनी बोबडे यांचा कल्याण रोड परिसरातील श्री महालक्ष्मी मित्र मंडळाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# पोलीस अंमलदार तेजस्विनी बोबडे एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण; पीएसआय पदावर झाली निवड

नगर – जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर शेतकरी कुटुंबातील कन्या तेजस्विनी कल्याण बोबडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली असून, त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली आहे. त्या गेल्या आठ वर्षांपासून महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत असून नोकरी सांभाळत त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल श्री महालक्ष्मी मित्र मंडळ, कल्याण रोड यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभास सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे, शेषराव आडोळे, बाबासाहेब आंधळे, सोपानराव रोकडे, शंकर बोरुडे, गणेश बेरड, निकिता बेरड, राजू पाडळे आदी उपस्थित होते.

ॲड. युवराज शिंदे म्हणाले, आजच्या काळात मुली प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उम टवत आहेत. शिक्षण, प्रशासन, पोलीस सेवा आणि स्पर्धा परीक्षांमध्ये मुली उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. शेतकरी कुटुंबातील तेजस्विनी बोबडे यांनी नोकरीची जबाबदारी सांभाळत अभ्यासात सातत्य ठेवले आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड मिळवली. त्यांचे हे यश अनेक तरुण-तरुणींना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस श्री महालक्ष्मी मित्र मंडळाच्या वतीने शुभेच्छा देत त्या समाजाभिमुख आणि जनतेच्या हिताचे कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना तेजस्विनी बोबडे म्हणाल्या, पोलीस खात्यातील नोकरी सांभाळत नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि कुटुंबाच्या पाठबळामुळे एमपीएससी परीक्षेत यश मिळाले. पोलीस उपनिरीक्षक म्हणून मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत समाजासाठी चांगले काम करण्याचा प्रयत्न करणार आहे. या यशामागे आई-वडिलांचे कष्ट, कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत समर्थ लखापतीला कास्यपदक



नगर – बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलमधील इयत्ता सातवीतील इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी समर्थ चेतन लखापती याने बारा वर्ष वयोगटात कांस्यपदक पटकावले. त्याला पदक, ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करुन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राज्य मॅरेथॉन स्पर्धेत ७०० ते ८०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लबमधून ७० स्पर्धक होते. ४ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी दाखवली. त्यामुळे क्लबला ३५ गोल्ड मेडल, २० सिल्वर मेडल व १५ कांस्य मेडल तसेच सर्टिफिकेट, ट्रॉफी मिळाल्या. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लब ने २४ जिल्ह्यांमधून प्रथम क्रमांक पटकावून सहा फूट उंचीची ट्रॉफी मिळवली महाराष्ट्र राज्य ट्रॉफीवर क्लबने नाव कोरल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. समर्थ हा चेतन लखापती यांचा मुलगा असून ते आमदार संग्राम जगताप यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

त्याला क्लबचे अध्यक्ष गोरख धात्रक, सुशील केदार व आदित्य पालवे यांचे मार्गदर्शन लाभले. मला प्रत्येक स्पर्धेसाठी विविध परीक्षांसाठी कायम माझे आजोबा मुकुंद लखापती यांची प्रेरणा तर आई-वडील यांचे मोलाचे योगदान मिळत असते असे समर्थ याने आवर्जून सांगितले.

# पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश वाटप



सिद्धार्थनगर येथील पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश वाटप करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – सिद्धार्थनगर येथील पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते शाळेतील १११ गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम पोपटराव पाथरे व घोरपडे मित्र मंडळ यांच्या वतीने राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते होते. यावेळी नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे, महित पंजाबी, जय भोसले, सुमेध गायकवाड, जयंत गायकवाड, सुनिल क्षेत्रे आदी उपस्थित होते.

आमदार जगताप म्हणाले, विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षणामुळेच विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा मिळते. त्यामुळे अशा सामाजिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजात समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांचे विचार आजही युवकांना प्रेरणा देणारे आहेत. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजासाठी सकारात्मक कार्य केले पाहिजे. आपण समाजात वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून वाढदिवस, सण-उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी सामाजिक बांधिलकी जपत साजऱ्या केल्या तर त्याचे समाजाला मोठे योगदान मिळेल.

शाळेचे मुख्याध्यापक शेखर उंडे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमासाठी रमेश उकर्डे, मंगला गोसावी, ज्योती वांगणे, वंदना शिरसाठ, लुमाजी साबळे आणि सोनाली तिवारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने आमदार संग्राम जगताप यांचा नागरी सत्कार



अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने आ. संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर शहराच्या विकासात मोलाचे योगदान देत शहराचा चेहरामोहरा बदलणारे, रिक्षा व टॅक्सी चालक-मालकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार संग्राम जगताप यांचा अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला.

शहरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, विविध रिक्षा स्टॅण्डचे सुशोभीकरण, कोरोना काळातील मदतकार्य, राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अविनाश घुले, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी सभापती कुमार वाकळे, ज्ञानदेव पांडुळे, बाली बांगरे, अजय चितळे, वैभव ढाकणे, गोरख पडोळे, संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे, उपाध्यक्ष दत्ता वामन, उपाध्यक्ष सुधाकर साळवे, उपाध्यक्ष नासिर खान यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व रिक्षाचालक उपस्थित होते.

प्रारंभी संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे यांनी प्रास्ताविक करताना संघटनेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. रिक्षा चालकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी संघटना सातत्याने संघर्ष करत असून प्रत्येक वेळी आमदार संग्राम जगताप यांनी सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे त्यांनी सांगितले.

संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अविनाश घुले म्हणाले, एकेकाळी शहरातील अनेक रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था होती. खराब रस्त्यांमुळे रिक्षांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करावी लागत होती आणि चालकांचा खर्च वाढत होता. मात्र आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारामुळे शहरातील बहुतांश रस्त्यांचे काँक्रिटीकरण झाले असून ३० ते ३५ वर्षे टिकणारे दर्जेदार रस्ते नागरिकांच्या सेवेत आले आहेत. जीपीओ रिक्षा स्टॅण्ड, पर्सनल गेट रिक्षा स्टॅण्ड, छत्रपती शिवाजी राजे चौक, माळीवाडा बसस्थानक रिक्षा स्टॅण्ड, पुणे बसस्थानक आऊटगेट रिक्षा स्टॅण्डसह विविध ठिकाणांचे काँक्रिटीकरण झाल्याने रिक्षाचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले, शहरातील रिक्षा चालक हे खऱ्या अर्थाने शहराचे सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. शहरात कुठे काय घडते, कोणत्या भागात कोणती समस्या आहे, नागरिकांच्या अडचणी काय आहेत याची सर्वाधिक माहिती रिक्षा चालकांनाच असते. त्यामुळे शहराच्या विकासात आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यातही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. रिक्षा चालकांना सन्मानाने व्यवसाय करता यावा, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी संघटनेचे सरचिटणीस अशोक औशीकर, सहसरचिटणीस जुनेद लतीफ बागवान, खजिनदार गणेश आटोळे, संघटक सोपान दळवी, किशोर कुलट, अन्वर शेख, बाळासाहेब साळवे, सागर लांडे, गोरख खांदवे, किशोर खुडे, लक्ष्मण ढगे, गणेश खाडे, सतीश मोबाळ, सुनील ढोले, सुनील खर्पे, शाहू लंगोटे, आशिष दांगडे, भोला शिंदे, वसंत मोकाटे, प्रकाश तोरडमल, गोरख आंबेकर, केशव बरकते यांच्यासह रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

### रिक्षा-टॅक्सी चालकांच्या प्रश्नांसाठी नेहमीच खंबीरपणे उभा राहीन

सत्काराला उत्तर देताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, रिक्षा आणि टॅक्सी चालक हा शहराच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक रिक्षाचालकांचे उत्पन्न पूर्णपणे बंद झाले होते. त्यावेळी संघटनेच्या माध्यमातून किराणा किटचे वाटप करण्यात आले. अनेकांना हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध करून देण्यात आले तसेच औषधोपचारासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्यात आले. संकटाच्या काळात सम ाजाच्या पाठीशी उभे राहणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य आहे. शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना एकत्र आणले जाईल. प्रायव्हेट प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढत आहे. तीन प्रवाशांचा परवाना असताना दहा-दहा प्रवासी वाहतूक करणे अत्यंत धोकादायक आहे. अपघात झाल्यास संबंधित चालकावर मोठी आर्थिक जबाबदारी येऊ शकते. तसेच इम्पेरियल चौक, माळीवाडा, लक्ष्मीमाता मंदिर परिसर, स्वस्तिक चौक, बसस्थानक परिसर आदी ठिकाणी रस्त्यावर आडव्या-तिडव्या किंवा दुहेरी रिक्षा उभ्या केल्यामुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक शिस्त पाळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, संभाजीनगर, बीड व इतर शहरांतून बेकायदेशीरपणे येऊन प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी रिक्षांवर कठोर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन दिले. रिक्षा चालकांच्या न्याय मागण्यांसाठी आपण सातत्याने शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करू, असेही त्यांनी सांगितले. तसेच केंद्र शासनाच्या लेट फीच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानभवनात प्रश्न उपस्थित करून दिलासा मिळवून दिल्याचा उल्लेख करत संघटनेच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावल्याचे त्यांनी नमूद केले.

# वेदमूर्ती महेश रेखे, देवव्रत रेखे यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान





नगर – येथील सनातन धर्म सभेचे अध्यक्ष घनपाठी वेदमूर्ती महेश रेखे यांना राष्ट्रीय शुक्ल यजुर्वेदी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच त्यांचे चिरंजीव विक्रमादित्य दंडक क्रम पारायण करते युवा वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना राष्ट्रीय वेद पुरस्कार देऊन श्रीक्षेत्र नाशिक सन्मानित करण्यात येणार आहे.

नाशिक येथील महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान यांच्यातर्फे चतुर्वेद संमेलन व धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय वेदशास्त्र पुरस्कार वितरण सोहळा १० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत कॉलेज रोडवरील गोखले एज्युकेशन सोसायटी कॅम्पस येथील गुरुदक्षिणा हॉलमध्ये हा सोहळा होणार आहे. या सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. भारतीय प्राचीन वैदिक संस्कृतीचे मूळ असलेल्या वेदांचा प्रसार, अध्ययन-अध्यापन आणि जतन करणाऱ्या देशभरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ वेदशास्त्र पंडितांचा या सोहळ्यात विशेष सन्मान केला जाणार आहे.

या वर्षी राष्ट्रीय वेदशास्त्र पंडित पुरस्कारार्थींमध्ये राष्ट्रीय ऋग्वेद पुरस्कार वेदाचार्य संतोष कुमार घनपाठी (हैदराबाद), राष्ट्रीय शुक्ल यजुर्वेद पुरस्कार महेश रेखे घनपाठी (अहिल्यानगर), राष्ट्रीय सामवेद पुरस्कार : वेदाचार्य श्रीकृष्ण श्रौती, चेन्नई, राष्ट्रीय अथर्ववेद पुरस्कार : वेदाचार्य रामचंद्र जोशी (तिरुपती), राष्ट्रीय शास्त्र पुरस्कार : वेदाचार्य राजेश्वर देशमुख (पुणे), राष्ट्रीय यजुर्वेद सेवाव्रती पुरस्कार : दुर्गादास मुळे, श्याम सुंदर जोशी यांना तर राष्ट्रीय वेद पुरस्काराने वेदाचार्य दंडक्रम विक्रमादित्य देवव्रत रेखे यांना विशेष सन्मानित केले जाणार आहे.

चतुर्वेद संमेलनाच्या माध्यमातून वैदिक ज्ञानपरंपरा, वेदाध्ययन आणि प्राचीन भारतीय संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित होणार आहे. राज्यातील त्याचप्रमाणे नाशिक परिसरातील नागरिक, वेदप्रेमी, वैदिक संस्कृतीचे अभ्यासक व अभिमानी, संस्कृतप्रेमी तसेच भाविकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे कार्याध्यक्ष रतन लथ, कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, वैभव जोशी, दीपक बागड, डॉ. विश्वास देवकर, कुमार भट्ट, रामगोपाल अय्यर, दत्तात्रय पैठणे यांनी केले आहे.

# अवधुत फुलसौंदर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी, शस्त्रक्रिया शिबीर

नगर – फुलसौंदर मळा येथील वैष्णव मित्र मंडळाच्या वतीने ॲड. अवधुत भगवानराव फुलसौंदर यांच्या वाढदिवसा - निमित्त अहिल्यानगर महापालिका आणि साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ऑगस्ट रोजी मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता अहिल्यानगर शहराचे विद्यमान आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नक्षत्र लॉन येथे होणार आहे. शिबिर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात सामान्य वैद्यकीय तपासणीसह मधुमेह, हृदयविकार, बालरोग, त्वचारोग व अस्थिरोग तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व उपचार केले जाणार आहेत. तसेच रक्तदाब, बीएमआय व वजन तपासणी, ईसीजी, नेत्र तपासणी, मूत्रपिंड तपासणी, युरिक ॲसिड, रक्त तपासणी, लिपिड प्रोफाइल, रक्तातील साखरेची सरासरी (एचबीए१सी), यकृत तपासणी, थायरॉईड तपासणी, क्षयरोग तपासणी तसेच छातीचा एक्स-रे आदी तपासण्या करण्यात येणार आहेत. याशिवाय महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत शस्त्रक्रियेचाही लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे. या आरोग्य शिबिराचा शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वैष्णव मित्र मंडळ आणि ॲड.अवधुत भगवानराव फुलसौंदर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या नेत्र तपासणी शिबिरातून गरजूंवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमातून तपासणी झालेल्या रुग्णांपैकी २२ ज्येष्ठ नागरिकांवर मोफत मोतीबिंदू व काचबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच शिबिरात रक्तदाब, मधुमेह आणि इतर आरोग्य तपासण्यांचीही मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक तथा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत, संस्था गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उल्लेखनीय सेवा देत असल्याचे सांगितले.

दत्ता गाडळकर म्हणाले, अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत असून, या सामाजिक उपक्रमात केमिस्ट असोसिएशनचेही पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी ह.भ.प. देवीदास महाराज बारस्कर यांनी फिनिक्सच्या उपक्रमाचे कौतुक केले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी संस्थेच्या भविष्यातील आरोग्यविषयक योजनांची माहिती दिली. ते म्हणाले की, नागरदेवळे येथून सुरू झालेली मोफत नेत्र तपासणीची चळवळ आज हजारो-लाखो नागरिकांपर्यंत पोहोचली आहे. या सेवेला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी तपोवन रोड परिसरात अत्याधुनिक नेत्रालय उभारण्याचा प्रस्ताव असून, या हॉस्पिटलच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब रुग्णांना पूर्णतः मोफत आणि दर्जेदार नेत्रोपचार उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस असल्याचे ते म्हणाले.

शिबिरात अनुभवी नेत्रतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर निवड झालेल्या २२ रुग्णांवर पुणे येथील के. के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना आवश्यक मार्गदर्शन तसेच पुढील उपचारांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

याशिवाय गरजू नागरिकांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या सर्वांगीण आरोग्याचा विचार करून रक्तदाब, मधुमेह आणि इतर प्राथमिक आरोग्य तपासण्यांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

या शिबिरासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, बाबासाहेब धीवर, राजेंद्र बोरुडे, रवी बालटे, ओम बोरुडे, जय बोरुडे, जगदीश बोरुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार, विशाल भिंगारदिवे, फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरदेवळे ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# चविष्ट मसाला शेवया

झटपट रेसिपी

न्याहरीचा एक उत्तम पर्याय म्हणजे मसाला शेवया. हा झटपट तयार होणारा आरोग्यदायी पदार्थ आहे. हॉस्टेलमध्ये काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर मसाला शेवया नक्की करून बघा.

**सामग्री :** एक कप भाजलेल्या शेवया, एक बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला टोमॅटो, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा कप उकडलेले मटार, एक बारीक चिरलेली सिमला मिरची, अर्धा चमचा जीरं, अर्धा चमचा लाल तिखट, प्रत्येकी अर्धा चमचा हळद आणि धनेपूड, एक चमचा गरम मसाला, लिंबाचा रस, एक कप पाणी, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ

**कृती :** कढईत दोन ते तीन चमचे तेल गरम करा. त्यात जीरं घाला. मग कांदा परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि मटार घालून परता. सोबत आलं-लसूण पेस्ट घाला. मग लाल तिखट, धनेपूड, हळद घालून परतून घ्या. मसाल्यातून तेल सुटलं की त्यात शेवया घाला. चवीनुसार मीठ घाला. पाणी घालून शिजवून घ्या. पाणी आटल्यावर गरम मसाला घाला. दोन मिनिटं शिजू द्या. गॅस बंद करा. शेवयांवर कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



# जोश

## शेर की जुबानी

दिल के लिये हयात का,
पैगाम बन गई,
बेचैनियां सिमट के तेरा,
नाम बन गई।

दिल पर हम बेवजह
इल्जाम लगाते हैं,
धोका तो अक्सर
धडकन दिया करती है।

ये दोस्ती भी
एक रिश्ता है,
जो निभा दे वो
फरिश्ता है।

# जिद्द एका असामान्याची!

अचिव्हर



'यश त्यांनाच मिळते जे वारंवार अपयश आल्यानंतरही आपल्या ध्येयापासून मागे हटत नाहीत,' या उक्तीची प्रचिती देणारी मध्य प्रदेशातील मनोज पाल यांची यशोगाथा सध्या चर्चेत आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये तब्बल ४० अपयश, समाजाचे टोमणे आणि १२ वर्षांचा संघर्ष यावर मात करत त्यांनी अखेर मध्य प्रदेश लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले.

मनोज पाल हे मध्य प्रदेशमधील एका छोट्या गावातील रहिवासी असून ते शेतकरी कुटुंबातून आले आहेत. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण सरकारी शाळेत झाले. मर्यादित सुविधा आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांनी लहानपणापासूनच सरकारी नोकरी मिळवण्याचा निर्धार केला होता. 'एमपीपीएससी' च्या तयारीसोबतच त्यांनी विविध स्पर्धा परीक्षांचीही तयारी सुरू ठेवली. सुरुवातीला त्यांनी फॉरेस्ट गार्डची लेखी परीक्षा उत्तीर्ण केली; मात्र शारीरिक चाचणीत अपयश आल्याने त्यांना नोकरी मिळू शकली नाही. त्यानंतर त्यांनी 'एमपीपीएससी' आणि इतर अनेक स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला.




मनोज यांनी 'एमपीपीएससी' सह विविध स्पर्धा परीक्षांचे मिळून सुमारे ४० प्रयत्न केले. अनेक वेळा ते काही गुणांच्या फरकाने अपयशी ठरले. 'एमपीपीएससी' मध्ये सलग सहा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर ते निराश झाले होते; मात्र मित्रांच्या यशातून त्यांना प्रेरणा मिळत राहिली आणि त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरूच ठेवली. सततच्या अपयशामुळे त्यांना समाजासोबतच कुटुंबीयांकडूनही टोमणे ऐकावे लागले. 'आता अभ्यास करू नकोस, काहीही काम कर,' अशा प्रतिक्रिया त्यांना वारंवार ऐकाव्या लागल्या; मात्र या नकारात्मक अनुभवांनी खचून न जाता त्यांनी अधिक जिद्दीने तयारी सुरू ठेवली.

अखेर १२ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर 'एमपीपीएससी' च्या सातव्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले. २०२४ मधील 'एमपीपीएससी' परीक्षेत त्यांनी राज्यात १५ वा क्रमांक मिळवत अधिकारी होण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले. कठोर परिश्रम, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मनोज पाल यांनी अपयशाचे यशात रूपांतर करत अनेक स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

## टेक्नो टॉक

### रोबो करेल नैराश्य दूर



एकटेपणा दूर करण्यासाठी आणि डिप्रेशनमधून बाहेर काढण्यासाठी चक्क एक रोबो तुमचा 'सोबती' बनणार आहे. विशेष म्हणजे, तुमच्या डोळ्यांमधील उदासी ओळखून हा रोबो स्वतःहून तुमच्याशी संवाद साधू शकतो. वृद्ध, एकटे राहणारे, तसेच मानसिक तणावाचा सामना करणाऱ्या व्यक्तींसाठी त्याची रचना करण्यात आली आहे. तो मानवी भावना, हावभाव आणि संवादाची सुमारे ९० टक्के नक्कल करतो. यात विशेष ३ डी तंत्रज्ञान आहे. याद्वारे हा रोबोट तुमच्या कोणत्याही दूर गेलेल्या किंवा मृत नातेवाइकाचा चेहरा आणि आवाज हुबेहूब कॉपी करू शकतो. त्यामुळे आपली माणसे आपल्यासोबतच असल्याचा भास होईल. मात्र, दुसरीकडे तंत्रज्ञानतज्ज्ञांनी अशा रोबोमुळे लोकांच्या गोपनीयतेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली आहे. हा रोबो मानवी हालचालींची सुमारे ९० टक्के अचूक नक्कल करू शकतो. जैवयांत्रिक रचना आणि दुहेरी अक्ष प्रणालीमुळे मान, खांदे आणि धड यांची हालचाल अधिक नैसर्गिक दिसते. आनंद, दुःख, राग, आश्चर्य आणि नैराश्यासह २० हून अधिक भावनिक स्थिती, चेहऱ्यावरील संकेत ओळखण्याची क्षमता या रोबोत आहे.

# जपानमध्ये सर्वात फास्ट इंटरनेट

टेक टॉक

तुम्ही अॅप उघडण्यासाठी लागणाऱ्या वेळेत संपूर्ण नेटफ्लिक्स लायब्ररी डाउनलोड करू शकाल का? हा विनोद नाही, तर जपानमध्ये अलीकडेच उदयास आलेल्या इंटरनेट तंत्रज्ञानाचे खरे स्वरूप आहे. जून २०२५ मध्ये जपानच्या राष्ट्रीय माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान संस्थेने (एनआयसीटी) जगातील सर्वात वेगवान इंटरनेट गतीचा विक्रम मोडला. त्यांनी प्रति सेकंद १.०२ पेटाबाइट्स म्हणजेच प्रति सेकंद १ दशलक्ष गीगाबाइट्सपेक्षा जास्त वेगाने डेटा प्रसारित केला.




स्टीमवरील सर्व गेमची एकूण साईझ सुमारे १.२ पेटाबाइट्स आहे. या नवीन गतीसह तुम्ही तुमच्या सिस्टममध्ये बाल्डूरच्या गेट ३ पासून काउंटर-स्ट्राइक २ पर्यंतचे सर्व गेम्स काही सेकंदात डाउनलोड करू शकता. तुम्ही एकाच वेळी १ कोटी ८ के व्हिडिओ स्ट्रीम करू शकता. म्हणजेच न्यूयॉर्क आणि टोकियोच्या संपूर्ण लोकसंख्येने एकाच वेळी वेगवेगळे चित्रपट पाहिले तरी वेग कमी पडणार नाही. स्पॉटिफायच्या मते एका मिनिटाचे गाणे सुमारे १ एमबी असते. त्यानुसार तुम्ही एका सेकंदात ६७ दशलक्ष गाणी म्हणजेच सुमारे १,२७,५०० वर्षांचे संगीत डाउनलोड करू शकता. इंग्रजी विकिपीडिया सुमारे शंभर जीबी आहे.

# फॉलो द एटिकेट्स

फिटनेस फंडा

दोस्तांनो, तुम्ही जीमला जाता. जीममध्ये काही एटिकेट्स फॉलो करावे लागतात. हे नियम कुठेही लिहून ठेवलेले नसतात. पण आपणच काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. जीममध्ये कोणत्या गोष्टी टाळता येतील? जाणून घेऊ.

* आपण जीममधली उपकरणं वापरतो. डंबेल्ससारखी उपकरणं विशिष्ट ठिकाणी ठेवलेली असतात. त्यामुळे वापरानंतर ती जागच्या जागी ठेवायला हवीत. काहीजण डंबेल्स व्यायामाच्या ठिकाणीच ठेऊन जातात. मग जीममधल्या कर्मचाऱ्यांना ती नीट ठेवावी लागतात. त्याऐवजी आपणच ती जागेवर ठेवणं योग्य ठरतं.
* व्यायाम करून कितीही दमलात तरी हातातले डंबेल्स जोरात खाली टाकू नका. यामुळे डंबेल्स तुटू शकतात. इतरांचंही लक्ष विचलित होतं. त्यामुळे प्रत्येक उपकरण हळूवारपणे खाली ठेवा.




* जीममध्ये गेल्यावर स्मार्टफोन शक्यतो बाजूलाच ठेवावा. फोन जवळ असला तरी त्यावर मोठ्याने बोलू नये. जीममध्ये म्युझिक सुरू असतं. लोकांचा आवाजही येत असतो. त्यामुळे ऐकू आलं नाही तरी तुम्ही हळूच बोला.
* व्यायाम करताना इतरांशी गप्पा मारू नका. सगळं लक्ष व्यायामावर केंद्रित करा. मोठ्याने गप्पा मारल्याने इतरांना त्रास होऊ शकतो.

## वर्ल्ड ऑफ एआय

### ऑडिओ निर्मितीच्या जगात एक नवे पर्व

कल्पना करा, तुम्ही काही ओळी लिहिल्या आणि संगणकाने त्या अगदी मानवासारख्या आवाजात वाचून दाखवल्या. इतकेच नव्हे, तर तो आवाज तुमच्यासारखाही असू शकतो! काही वर्षांपूर्वी ही गोष्ट विज्ञानकथेतील कल्पना वाटली असती. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्तेतील झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे आज हे वास्तव झाले आहे. या क्षेत्रात जगभरात विशेष चर्चेत असलेले नाव म्हणजे 'इलेव्हनलॅब्स'.




हे साधन मजकुराचे नैसर्गिक आवाजात रूपांतर करते, विविध भाषांमध्ये बोलू शकते आणि अगदी एखाद्या व्यक्तीचा आवाजही तयार करू शकते. त्यामुळे ऑडिओ निर्मितीच्या जगात एक नवे पर्व सुरू झाले आहे. 'इलेव्हनलॅब्स' हा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'व्हॉइस एआय' प्लॅटफॉर्म आहे. याच्या मदतीने आपण लिहिलेला मजकूर काही सेकंदांमध्ये मानवासारख्या नैसर्गिक आवाजात ऐकू शकतो. आजपर्यंत 'टेक्स्ट टू स्पीच' तंत्रज्ञान उपलब्ध होते; परंतु त्यामध्ये मशीनसारखा कृत्रिम आवाज जाणवत असे. इलेव्हनलॅब्स मात्र आवाजातील भावना, थांबे, चढ-उतार आणि बोलण्याची शैली यांचा विचार करून अत्यंत वास्तववादी आवाज तयार करते. अनेक वेळा हा आवाज खऱ्या व्यक्तीचा आहे, की कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे तयार केलेला आहे हे ओळखणेही कठीण होते. यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या आवाजाचा छोटासा नमुना कृत्रिम बुद्धिमत्तेला दिला जातो. त्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता त्या आवाजाची वैशिष्ट्ये समजून घेते आणि त्याच प्रकारे नवीन मजकूर बोलू शकते.

प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत वेगळी असते. काही विद्यार्थी वाचनातून शिकतात, तर काही जण ऐकून अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतात. 'इलेव्हनलॅब्स'च्या मदतीने अभ्यास साहित्य, नोट्स, लेख, सादरीकरणे किंवा प्रशिक्षण सामग्री ऑडिओ स्वरूपात उपलब्ध करून देता येते.

#### काही धोके आणि जबाबदारी

प्रत्येक तंत्रज्ञानाप्रमाणे यालाही काही आव्हाने आहेत. आवाज क्लोनिंगचा गैरवापर होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीचा आवाज वापरून चुकीची माहिती पसरविणे किंवा फसवणूक करणे शक्य आहे. म्हणूनच अशा तंत्रज्ञानाचा वापर करताना नैतिकता, परवानगी आणि जबाबदारी यांचे पालन करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान जितके शक्तिशाली, तितकी त्याच्या वापरकर्त्यांची जबाबदारी अधिक असते. आपण ज्या पद्धतीने मजकूर वाचतो, त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावर माहिती ऐकली जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता आता केवळ प्रश्नांची उत्तरे देत नाही, तर ती आपल्या आवाजात बोलूही लागली आहे. 'इलेव्हनलॅब्स' हे त्या बदलाचे अत्यंत प्रभावी उदाहरण आहे. शिक्षण, व्यवसाय, मनोरंजन आणि संवाद यांची पद्धत बदलण्याची क्षमता या तंत्रज्ञानामध्ये आहे. येणाऱ्या काळात आवाजाच्या दुनियेत कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका अधिक महत्त्वाची होत जाणार आहे आणि 'इलेव्हनलॅब्स' त्यातील अग्रगण्य खेळाडू म्हणून ओळखले जात आहे.

# स्वस्तात मस्त!

फॅशन पॅशन



फॅशनेबल आणि प्रीमियम दर्जाचे कपडे घ्यायचे असतील; पण त्यासाठी जास्त खर्च करायचा नसेल, तर अर्बानो फॅशनचे पुरुषांसाठीचे कलेक्शन एक चांगला पर्याय ठरू शकतो. या ब्रँडचे टी-शर्ट ५९९ रुपयांपेक्षा कमी किमतीत उपलब्ध आहेत.

**मँडरिन कॉलर टी-शर्ट**


दैनंदिन वापरासाठी साधा पण स्टायलिश पर्याय शोधत असाल, मँडरिन कॉलर टी-शर्ट योग्य ठरू शकतो. हा टी-शर्ट १०० टक्के कॉटन फॅब्रिकपासून तयार करण्यात आला हा टी-शर्ट उन्हाळ्यात आरामदायी वाटतो.


**ओव्हरसाइज राऊंड नेक टी-शर्ट**

सध्या ओव्हरसाइज टी-शर्टचा ट्रेंड मोठ्या प्रमाणात लोकप्रिय आहे. तो हलका, आरामदायी आणि स्ट्रीट स्टाइलसाठी योग्य आहे. उपलब्ध असलेला हा टी-शर्ट कॅज्युअल वापरासाठी उत्तम पर्याय आहे.

**टार्टन चेक्स कॅज्युअल शर्ट**

पांढऱ्या रंगातील हा स्लिम फिट शर्ट स्प्रेड कॉलर आणि आकर्षक फिनिशमुळे स्मार्ट लूक देतो. कॉटन आणि पॉलिस्टर मिश्रित फॅब्रिकपासून तयार करण्यात आलेला हा शर्ट कॅज्युअल तसेच सेमी-फॉर्मल प्रसंगांसाठी योग्य आहे.





# वर्षाविहार...

भटकंती

पावसाळा म्हटले की, आल्हाददायक वातावरण! या काळात हिरवळ, धबधबे, ढगांनी वेढलेले डोंगर आणि थंडगार वाऱ्यांमुळे नैसर्गिक सौंदर्य अधिकच खुलते. या ऋतूत प्रवास करणे हा एक अनोखा अनुभव असतो. पावसाळ्यात तुम्ही काही ठिकाणी फिरायला जाण्याचा प्लॅन करतात; पण अनेकदा लोकप्रिय ठिकाणी मोठी गर्दी पाहायला मिळते. अशा वेळी कमी गर्दीच्या आणि निसर्गाच्या सान्निध्यात असलेले ठिकाणी जाणे अधिक चांगला पर्याय ठरू शकतो.

**अगुंबे (शिवमोग्गा, कर्नाटक)**

अगुंबेला 'दक्षिण भारताचे चेरापुंजी' म्हणूनही ओळखले जाते. येथे मुसळधार पावसामुळे जंगले, धबधबे आणि दऱ्या खरोखरच विस्मयकारक दिसतात.

**ताम्हिणी घाट (पुणे जिल्हा)**

पुण्याजवळील ताम्हिणी घाट पावसाळ्यात हिरवळ, धबधबे आणि धुक्याने वेढलेला असते. पावसाळ्यात येथील नैसर्गिक दृश्य खरोखरच मनमोहक असते. वीकेंड ट्रिप आणि रोड ट्रिपसाठीही हे एक लोकप्रिय ठिकाण आहे.

**पोनमुडी (तिरुवनंतपुरम, केरळ)**

केरळमधील पोनमुडी हिल स्टेशन हे वळणदार रस्त्यांसाठी, चहाच्या मळ्यांसाठी आणि ढगांनी वेढलेल्या टेकड्यांसाठी प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात येथील हिरवळ अधिकच खुलून दिसते. येथील शांत वातावरण आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे हे ठिकाण कुटुंबे आणि जोडप्यांसाठी एक आदर्श पर्यटन स्थळ ठरते.

**मांडू (धार, मध्य प्रदेश)**

मांडू ऐतिहासिक किल्ल्यांसाठी, राजवाड्यांसाठी आणि नैसर्गिक सौंदर्यासाठी ओळखले जाते. पावसाळ्यात येथील डोंगर आणि तलाव पाहण्यासारखे असतात. हिरव्यागार वनराईने वेढलेले हे ऐतिहासिक शहर इतिहास आणि निसर्गाचा एक अनोखा संगम सादर करते.

# दिसणं महत्त्वाचं आहे?

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची मुलगी आहे. गेल्या काही दिवसांपासून माझ्यासाठी सुयोग्य जोडीदाराचा शोध सुरू आहे. मध्यंतरी माझ्यासाठी एक स्थळ आलं होतं. मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर असून त्याचं कुटुंब खुल्या विचारांचं आहे. पण तो दिसायला सर्वसाधारण आहे. खरं सांगायचं तर थोडा स्थूल आहे. मला तो पसंत पडलेला नाही. मी गोंधळून गेले आहे. माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. त्याची जीवनशैली माझ्यापेक्षा खूप वेगळी आहे. मला आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा मुलगा हवा आहे. आमची लाईफस्टाईल जुळत नसल्याने मी त्याला नकार द्यावा का बाकी सगळं चांगलं नसल्यामुळे याकडे दुर्लक्ष करावं? याबाबत मला मार्गदर्शन करा.



**उत्तर :** स्थूलपणा सोडल्यास त्याच्यात कोणतीही कमतरता नसेल तर तू याबाबत त्याच्याशी बोलू शकतेस. त्याला भेटून तुझं मत मांडायला काहीच हरकत नाही. आरोग्यदायी जीवनशैली, फिटनेस यांचं महत्त्व तू त्याला पटवून देऊ शकतेस. आजकाल एका स्थूलपणामुळे सामान्य माणसाला किती व्याधी जडू शकतात, याची माहिती घे. गरज वाटल्यास समुपदेशकांची मदत घेता येईल. त्यामुळे नकार देण्याचा निर्णय घाईघाईने घेऊ नकोस.

# क्षेत्र फोटो जर्नलिझमचं...

करियर वाट



दोस्तांनो, एक फोटो खूप काही सांगून जातो. फोटोतून आपण आपल्या भावना व्यक्त करू शकतो. एखादा फोटो लोकांच्या मनाला भिडतो. त्या फोटोतून एखाद्या ठिकाणच्या परिस्थितीचा अंदाज घेता येतो. तुम्हालाही फोटोतून व्यक्त व्हायचं असेल तर फोटो जर्नलिझमचा पर्याय उपलब्ध आहे. फोटो जर्नलिझम हे रंजक आणि धाडसी करिअर आहे. यात तुम्ही अंगभूत कौशल्यांचा वापर करू शकता. या क्षेत्रातल्या करिअरबाबतचं हे मार्गदर्शन...

* सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.

फोटोग्राफी शिकल्यानंतर तुम्ही एखादा वर्तमानपत्रात काम करू शकता. इथे तुम्हाला प्रशिक्षणही दिलं जातं. सुरूवातीला वरिष्ठ फोटोग्राफरच्या मार्गदर्शनाखाली काम करता येईल.

* या क्षेत्रात करिअर करण्याआधी स्वत:ची वेबसाईट तयार करा. या साईटवर तुम्ही फोटो पोस्ट करू शकता. तुमचे फोटो सोशल साईटवरही अपलोड करता येतील.
* वेबसाईट तयार केल्यानंतर सातत्याने फोटो अपलोड करत रहा. फोटो स्टोरी तयार करा. शब्दांशी खेळा. लेखनकौशल्यं वाढवा.
* या क्षेत्रात प्रचंड मेहनत करावी लागते. बाहेर फिरावं लागतं. त्यामुळे याची तयारी ठेवा.

# तणावाला तोंड देण्यासाठी...

मन:स्वास्थ्य

ताणतणावावर उपाय निश्चितच आहेत. प्रथम एक गोष्ट मान्य करूयात, की बाह्य परिस्थिती अशीच राहणार किंवा दिवसेंदिवस अधिक बिकट होत जाणार. त्याला तोंड देण्यासाठी आपण आतून शांत, कणखर, स्वस्थ व्हायला हवं. कसं?

* 'बाह्य' वातावरण कसंही असो आपण 'आतलं' वातावरण बदलायला हवं. त्यासाठी काही गोष्टी शिकायला हव्यात. बदलायला हव्यात. थोडक्यात मेंदूच्या (मनाच्या) कार्यपद्धतीत बदल करून नव्याने तयार करायला हवं.
* तणाव नियोजनाच्या पद्धती शिकून घ्यायला हव्यात. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व, आनुवंशिक गुण, स्वभाव, मेंटल मेकअप वेगळा असतो. त्यामुळे तणाव नियोजनाच्या पद्धतीही वेगळ्या असू शकतात.
* आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आपल्याला आयुष्यात नेमकं काय हवंय? पुरेसा पैसा हवाच, वैभवही हवं; परंतु फक्त पैसा, की पैशाबरोबरच स्वास्थ्य, मन:शांती? पैशानं सुखसोयी मिळतील. तथापि आनंद ही मनाची अवस्था आपल्याला प्राप्त करून घ्यावी लागेल. एका मर्यादेनंतर भोग, लालसा, चंगळवाद फक्त दुःख निर्माण करतात. हे लक्षात ठेवावं.



* ताण समजून घेणं व त्यांची नोंद करणं महत्त्वाचं. कुठल्या गोष्टींची काळजी वाटत राहते? कसली भीती वाटते? कशामुळे राग येतो? तो ताब्यात राहतो का? कशामुळे वाईट वाटतं? कुठला अपराधगंड वाटत राहतो का? शारीरिक व मानसिक अस्वास्थ्याची लक्षणे, अशा अनेक गोष्टींची नोंद करावी. तज्ज्ञांच्या साहाय्याने त्यावरचे उपाय शोधावेत.
* स्वयंसूचना व सर्जनशील कल्पनाचित्राची तंत्रे शिकून घ्यावीत. तज्ज्ञांकडून 'स्वीच ऑन-स्वीच ऑफ'ची तंत्रे शिकून घ्यावीत. त्यामुळे ऑफिस व वैयक्तिक आयुष्य यात सीमारेषा आखता येईल.
* आपल्या आयुष्यातली माणसं, मित्र आणि विशेष करून जोडीदार, त्यांच्या बरोबरची नाती महत्त्वाची आहेत हे समजून घ्यावे. जोडीदार नोकरी करत असल्यास त्याच्या मनःस्थितीचा विचार करावा. त्याचे ताण समजून घ्यायला हवेत. रात्री कितीही उशीर झाला तरी मायेचा स्पर्श आणि जिव्हाळ्याचं बोलणं, मन मोकळं करणं हे नियमित करायला हवं.
* व्यायाम, योगासने, प्राणायाम, ध्यान व वर्तमान क्षणात राहण्याची तंत्रे महत्त्वाची आहेत. त्यामुळे नाडीची गती ठराविक मर्यादेपर्यंत वाढेल. प्राणायाम, ध्यानाच्या काही पद्धती, श्वासावर आधारित ध्यान, माइंडफुलनेस, वर्तमान क्षणात राहण्याची तंत्रे शिकून घ्यावीत.
* संगीत, कविता, छंद आणि मैत्र हे एक उत्तम औषध आहे. मनस्थिती सुधारण्यासाठी रोज संगीताची साधना, आवडते संगीत रोज ऐकणे, कविता वाचणे, ऐकणे, आवडता छंद जोपासणे याची खूप मदत होते. तसेच जिव्हाळ्याचे परंतु निर्व्यसनी मित्र जोडणे याचा छान उपयोग होतो.
* आपल्याला स्वतःशी असलेलं नातं सुदृढ करायचं आहे. त्यासाठी रोज इतर व्यायामाबरोबरच ध्यान करणं. सुट्टीच्या दिवशी निसर्गाच्या सानिध्यात जाणं. तिथली शांतता अनुभवणं, आत भरून घेणं यामुळेही मनःस्वास्थ व्हायला मदत होते.

# लायन्सच्या अध्यक्षपदी हरजित वधवा तर लिओच्या हर्षवर्धन किथानी

## पदग्रहण सोहळ्यास तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क व हंगेरीतील युवकांची उपस्थिती



लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी तसेच लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन किथानी स्वीकारल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा संयुक्त पदग्रहण सोहळा नगर-संभाजीनगर मार्गावरील महाराजा हॉटेल येथे पार पडला. सोहळ्यात लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी तसेच लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन किथानी स्वीकारली. या पदग्रहण सोहळ्यास तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क व हंगेरीतील युवा प्रतिनिधींची विशेष उपस्थिती होती.

या सोहळ्यास रिजन चेअरमन संदीप गोंदकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर पदग्रहण अधिकारी म्हणून प्रविण गुलाटी उपस्थित होते. यावेळी बोलता गुलाटी म्हणाले, समाजातील गरजू, वंचित आणि संकटग्रस्त घटकांना आधार देण्याचे कार्य लायन्स क्लब सातत्याने करत असून, कोणतेही संकट आले तरी लायन्स व लिओ क्लब ऑफ अहमदनगरने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती दिली आहे. कोरोनाकाळात सुरू करण्यात आलेली लंगर सेवा आजही अविरत सुरू असून, या उपक्रमाने देशासह परदेशातील लायन्स संघटनांचेही लक्ष वेधून घेतले आहे. त्याचबरोबर लिओ क्लबच्या माध्यमातून युवक-युवती मोठ्या संख्येने सामाजिक चळवळीशी जोडले जात आहेत.

सोहळ्यात लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी स्वीकारली. सचिवपदी हरिष हरवानी तर खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष डॉ. संजय असनानी, सचिव प्रशांत मुनोत आणि खजिनदार दिलीप कुलकर्णी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदभार सोपविला. तसेच लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन किथानी, सचिवपदी रित जाजू यांनी पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष गुरनूरसिंग वधवा आणि खजिनदार जपज्योत बग्गा यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

लायन्स इंटरनॅशनलच्या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित इंटरनॅशनल यूथ एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत शहरात आलेले तुर्कस्तान (इस्तंबूल) येथील अभिनेत्री डेफ्ने एर्सेन, बेल्जियमची ईव्हा-लुना बेलॉय, डेन्मार्कचा एलियट केलर लॉरिट्झेन आणि हंगेरीचा फाबोक मॅथ्यास हे चार युवा प्रतिनिधी तसेच नॉर्वे येथे यूथ एक्स्चेंजसाठी गेलेले अहिल्यानगरचे जिनेश छाजेड यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजवंदनाने झाली. प्रणिता भंडारी यांनी ध्वजवंदन घेतले. अरविंद पारगावकर यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला, तर सुमित लोढा यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पदग्रहण अधिकारी प्रविण गुलाटी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पदाची शपथ देत त्यांच्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली. तसेच नव्याने लायन्स परिवारात दाखल झालेल्या सदस्यांना लायन्सच्या सेवाभावी परंपरेची, कार्यपद्धतीची आणि लायनिझम ची सविस्तर माहिती दिली.

नूतन अध्यक्ष हरजितसिंग वधवा म्हणाले, कोरोनाकाळात सुरू झालेली लंगर सेवा आजही निरंतर सुरू असून, गरजूंना मोफत अन्न उपलब्ध करून देण्याचे हे कार्य अधिक व्यापक केले जाणार आहे. याशिवाय आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, वंचित नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरे, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, जनजागृती अभियान आणि विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

लिओ क्लबचे नूतन अध्यक्ष हर्षवर्धन किथानी यांनी युवक-युवतींना समाजसेवेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार व्यक्त केला. तरुणांच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा देत रक्तदान, आरोग्य, पर्यावरण, शिक्षण आणि सामाजिक जनजागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

मावळते अध्यक्ष डॉ. संजय असनानी आणि लिओ क्लबचे मावळते अध्यक्ष गुरनूरसिंग वधवा यांनी मागील वर्षभरात राबविण्यात आलेल्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सेवाभावी उपक्रमांचा सविस्तर अहवाल सादर करून सदस्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सूत्रसंचालन डॉ. सिमरनकौर वधवा यांनी केले. धनंजय भंडारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाप्रसंगी सीए शंकर अंदानी, संदेश कटारिया, सुनिल छाजेड, डॉ. अनघा पारगावकर, किरण भंडारी, डॉ. मानसी असनानी, सतीश बजाज, डॉ. प्रिया मुनोत आदी उपस्थित होते.

## गुरुवाणी – ९



### गुरू शिष्याला समर्थ बनवतात

कोणत्याही आजाराचे मूळ कारण चुकीची भोजन पद्धती असते. तपस्या करताना फक्त पाणी प्राशन केले जाते. त्याचा आरोग्याला फायदाच होतो. तपस्या शक्तीने नाही श्रद्धेने होते. माता हुलसा यांनी गुरुदेवांना वंदनीय पूज्य रत्नऋषीजी महाराजांकडे नेले. जो गुरुदेवांबरोबर स्वतःला जोडतो, त्याला गुरुदेव तीर्थंकरांशी जोडतात. पूज्य रत्नऋषीजी महाराजांसारखे गुरु लाभणे हे भाग्यच असते. त्यांनी गुरुदेवांना असे घडवले की, त्यांनी आपल्या गुरूंचे सर्व स्वप्न पूर्ण केले. आपल्या शिष्याला जो भगवान बनवतो तो गुरु असतो. म्हणूनच आचार्य सम्राट म्हणताच एकच चेहरा समोर येतो, तो म्हणजे गुरुदेवांचा. प्रत्येक दगडाची मूर्ती बनत नाही, जो छन्नीचे घाव न तुटता सहन करतो त्याच पाषाणाची मूर्ती घडते. प्रवचन ऐकणे, देणे सोपे आहे, पण छन्नीचे घाव जो न तुटता सोसतो, तेच आनंद भगवान होतात. पूज्य रत्नऋषीजी म.सा. यांना घोडनदी येथे पूज्य तिलोकऋषीजी म.सा. यांनी दीक्षा दिली होती. पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी आपल्या शिष्याला 'समर्थ' बनवले. गुरू भरभरून देतात, शिष्य किती घेतो हे महत्त्वाचे ठरते. अर्जुनाला श्रीकृष्ण भेटल्यावर इतर कोणत्या गुरूची गरज पडली नाही. पूज्य रत्नऋषीजी महाराजांकडे अनेक शिष्य आले. पण, कायम टिकला तो माता हुलसा यांचा पुत्र. गुरू आपल्या शिष्याला दुःख सहन करण्यासाठी समर्थ बनवतो. पूज्य आनंदऋषीजींना साधनेसाठी स्वतंत्र रूम नव्हती. त्यावेळी शिष्याने २४ तास गुरूच्या नजरेखाली राहावे असे सूत्र होते. पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी पूज्य आनंदऋषीजींना हॉलमध्ये भिंतीकडे तोंड करून साधना करायला लावले. त्यांनी चित्त भटकण्याचे मार्गच बंद करून टाकले. हे अनुशासन गुरूदेवांनी स्विकारले. भारतात साठ सत्तर वर्षांपूर्वी शुगरचे रूग्ण अत्यल्प होते. कारण मिठाई कधीतरीच खाल्ली जायची. आज रोजच ताटात मिठाई असते. परिणामी शुगरचे रूग्ण वाढलेत. एकदा पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी आनंदऋषीजींना गोचरीत आलेली मिठाई दिली. पण ती खायला सुरुवात करताच ताडकन रोखले. त्यांनी सुनावले, 'मिठाई कधीच न मिळाल्यासारखी अधाशासारखी खाऊ नकोस. अशा गोष्टीमुळे तुझी आसक्ती वाढेल'. इतक्या बारकाईने पूज्य रत्नऋषीजी महाराजांनी आपल्या शिष्याला नखशिखांत घडवले. नगरकर परम पुण्यशाली आहेत, कारण इथंच गुरूदेवांनी आपलं शिखर पूर्ण केले.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



यंग इनोव्हेशन सायन्स एक्झिबिशनमध्ये यश मिळविणारे गुरुकुल व डॉ. पी. ए. इनामदार विद्यालयाचे विद्यार्थी.

# यंग इनोव्हेशन २०२६ मध्ये गुरुकुलचे यश

नगर – शहरात आयोजित यंग इनोव्हेशन सायन्स एक्झिबिशन २०२६ मध्ये गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल व डॉ. पी. ए. इनामदार विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण विज्ञान प्रकल्पांच्या प्रभावी सादरीकरणातून उल्लेखनीय यश संपादन केले.

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञानातील अभिनव कल्पना, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलतेचे उत्कृष्ट प्रदर्शन करत परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना उत्कृष्टता ट्रॉफी व प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षकांचे मोलाचे योगदान असून सौ. अस्मा बेग, सौ. शीतल रहाणे आणि सौ. योगिता मोहिते यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करून विज्ञान प्रदर्शनासाठी सक्षमपणे तयार केले. त्यांच्या परिश्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल एकता एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष एन. ए .पठाण, संस्थेचे चेअरमन अनिल साळुंके तसेच सचिव समीर पठाण, मुख्याध्यापक कुंदा झोंड, प्राचार्य दीप्ती कराळे, शिक्षकवृंद, पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आयएमएससीडीआरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावरील वेबिनारमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आयएमएससीडीआर) येथील लर्निंग रिसोर्स सेंटर (ग्रंथालय) यांच्या वतीने राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त ३ ऑगस्ट रोजी एआय अवेअरनेस टू ॲक्शन : प्रॅक्टिकल ॲप्लिकेशन्स इन हायर एज्युकेशन अँड फ्युचर रेडीनेस या विषयावरील राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाला. उच्च शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर, डिजिटल साक्षरता आणि भविष्याभिमुख कौशल्यांचा प्रसार हा वेबिनारचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गौरी पाटील यांनी केले. प्रारंभी त्यांनी राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांची ओळख करून देण्यामागील ग्रंथालयाचा उद्देश विशद केला.

प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे यांनी स्वागतपर भाषणात उपस्थितांचे स्वागत करून इंडस्ट्री क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मिळणारे व्यावहारिक मार्गदर्शन विद्यार्थी व शिक्षकांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी वेबिनारच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा देत ग्रंथालयाच्या उपक्रमाचे कौतुक केले. प्रा. प्रताप गायकवाड यांनी तांत्रिक सहाय्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. वेबिनारचे संपूर्ण नियोजन व समन्वय ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे करण्यात आले. वेबिनारमध्ये पुणे येथील सॉफ्टटेक सोल्युशन्स अँड सर्व्हिसेसचे संचालक चेतन तकसाळे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी एआय कौशल्ये आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी गुगल एआय स्टुडिओ, जेमिनी, नोटबुक एलएम, प्रेझी एआय, मॅनस १.६ तसेच इतर एआय-आधारित साधनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. अध्यापन, अध्ययन, संशोधन, कॉन्टेंट क्रिएशन, प्रशासकीय कामकाज आणि उत्पादकता वाढविण्यासाठी या साधनांचा प्रभावी वापर कसा करता येतो, याचे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले.

चॅटजीपीटीच्या सहाय्याने ई-फ्लायर्स तयार करणे, स्प्रेडशीट्सचे व्यवस्थापन, प्लगइन्सचा वापर, जेमिनीद्वारे लिटरेचर रिव्ह्यू, नोटबुकएलएमच्या साहाय्याने माहितीचे संकलन व सारांश तयार करणे तसेच एआय-आधारित गुगल फॉर्म्सद्वारे माहिती संकलन व विश्लेषणाची प्रक्रिया त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिली.

वेबिनारमुळे सहभागींना उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध व्यावहारिक उपयोग, नव्याने विकसित होत असलेली एआय साधने तसेच शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि भविष्याभिमुख कौशल्ये विकसित करण्याच्या प्रभावी पद्धतींची सखोल माहिती मिळाली. अध्यापन, अध्ययन, संशोधन आणि दैनंदिन शैक्षणिक कामकाजात एआयचा प्रभावी वापर कसा करावा, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. संसाधन व्यक्तींनी दिलेल्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांना सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# दिल्ली गेटवर झळकणार कोरा राजीनामा!

नगर – भारतीय संसदीय लोकशाहीला व्यक्तिपूजा, घराणेशाही, जातीय-धार्मिक ध्रुवीकरण, धनशक्ती, भ्रष्टाचार आणि निष्क्रिय प्रशासनाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी ८ ऑगस्ट रोजी देशभर जंतर-मंतर क्रांती दिवस साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने अहिल्यानगरच्या दिल्ली गेटवर कोरा राजीनामा लावण्यात येणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी दिली. या आंदोलनात नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, शेतकरी आणि कामगारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती आणि संविधानिक नैतिकतेपासून दूर गेलेल्या सत्ताधारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि सार्वजनिक सेवकांनी आत्मपरीक्षण करावे. लोकसेवेची पात्रता गमावली असेल, तर त्या कोऱ्या कागदावर राजीनामा लिहून जनतेने सोपविलेल्या सत्तेतून सन्मानाने बाजूला व्हावे, असा स्पष्ट संदेश या आंदोलनातून दिला जाणार आहे.

हा कोरा कागद कोणत्याही व्यक्तीविरुद्ध द्वेषाचे प्रतीक नसून जनतेच्या विवेकाचा आरसा आहे. तो सत्तेच्या नैतिक परीक्षणाची कसोटी आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाचे प्रतीक ठरणार आहे. लोककल्याणाची निष्ठा नसताना, अद्ययावत ज्ञान स्वीकारल्याशिवाय, जागरूक विवेक न वापरता, कर्तव्याची प्रभावी अंमलबजावणी न करता आणि संविधानिक मूल्यांना पायदळी तुडवत सार्वजनिक पदाला चिकटून राहणे म्हणजे लोकशाहीशी प्रतारणा होय, अशी भूमिका या सत्याग्रहातून मांडली जाणार आहे.

तुमच्या निर्णयामध्ये लोकहित आहे का?, तो निर्णय अद्ययावत ज्ञान आणि सत्यावर आधारित आहे का?, घोषणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे का?, तुमचे वर्तन संविधान आणि कायद्याच्या राज्याशी सुसंगत आहे का? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता येत नसतील, तर संबंधितांनी जनतेसमोर आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शिवीगाळ, हिंसा आणि पक्षीय द्वेषाऐवजी पुरावे, अहिंसा, विवेक आणि संविधानाच्या आधारावर सत्तेचा हिशेब मागण्याची नवी लोकशाही संस्कृती निर्माण करणे, हा कोरा राजीनामा उपक्रमाचा उद्देश असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीपासून संसदपर्यंत आणि शासकीय कार्यालयांपासून सर्व सार्वजनिक संस्थांपर्यंत नागरिकांनी कामाचा सामाजिक लेखाजोखा मागितला पाहिजे. व्यक्तिपूजेऐवजी तत्त्वनिष्ठा, घराणेशाहीऐवजी पात्रता, घोषणांऐवजी परिणाम आणि सत्तेच्या अहंकाराऐवजी जनतेसमोरील उत्तरदायित्व प्रस्थापित करणे, ही या आंदोलनाची दिशा राहणार असल्याचेही ॲड. गवळी यांनी सांगितले.

या आंदोलनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महोत्सवाची अंतिम फेरी ९ ऑगस्टला अहिल्यानगरला होणार

नगर – बालरंगभूमी परिषदेतर्फे दरवर्षी अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून इतिहास महाराष्ट्राचा हा महोत्सव साजरा केला जातो. दरवर्षी इतिहासातील एका थोर विभूतीला हा महोत्सव समर्पित असतो. या वर्षी महोत्सवाचा विषय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हा असून त्याची अंतिम फेरी घेण्याचा मान अहिल्यानगर शाखेला मिळाला आहे.

बालरंगभूमी परिषदेच्या सर्व शाखांमध्ये या स्पर्धेची प्राथमिक फेरी २ ऑगस्ट रोजी झाली असून अंतिम फेरी ९ ऑगस्ट रोजी माऊली सभागृहात होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून या महोत्सवासाठी जवळपास ४०० बालगोपाल सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमध्ये एकल छोटा गट, मोठा गट आणि सांघिक गटामध्ये विद्यार्थी अहिल्याबाई होळकरांचे जीवनकार्य नाट्यछटा, गाणी, नाट्यरूपांतर अशा विविध प्रकारात सादर करणार आहेत. नगरवासीयांसाठी ही स्पर्धा एक मोठी सांस्कृतिक पर्वणी असेल यात शंका नाही, असे मत परिषदेचे जिल्हा अध्यक्ष्य प्रसाद भणगे यांनी व्यक्त केले.

या महोत्सवाची अहिल्यानगर शाखेची प्राथमिक फेरी नुकतीच पार पडली. यात एकल गट क्र.१ मध्ये ध्वज विराज मुनोत, तर एकल गट क्र. २ मध्ये अद्वैती श्रीकृष्ण लुटे यांनी तर सांघिक गटामध्ये पी. एम. श्री. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय छावणी परिषद शाळा यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. इतिहास महाराष्ट्राचा नगर शाखेचा प्राथमिक फेरीचा बक्षीस वितरण समारंभ सिने अभिनेते हरिष बारस्कर तसेच राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त दिग्दर्शक अभिजित दळवी यांच्या हस्ते, बहुउद्देशीय सभागृह, पेमराज सारडा महाविद्यालय येथे करण्यात आला. या प्रसंगी बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती चे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी, देवीप्रसाद सोहोनी तसेच अहिल्यानगर शाखेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.





यंग इनोव्हेटर्स विज्ञान प्रदर्शनात शेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

# धूत इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांचा यंग इनोव्हेटर्स प्रदर्शन स्पर्धेत दुसरा क्रमांक

नगर – जे. जे. सायन्स अकॅडमी आणि रोटरी क्लब मिडटाउन अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने संजोग लॉन्स येथे यंग इनोव्हेटर्स विज्ञान प्रदर्शनात शेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

या प्रदर्शनात एकूण १८७ सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांची सादरीकरणे केली. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामासाठी उपयुक्त असलेली मॅजिक स्टिक विद्यार्थ्यांनी तयार केली होती. या संघातील ईशान जाजू, मित वर्मा, थोर्वी गुंदेचा आणि साची कोठारी यांना २० हजार रुपये रोख पारितोषिकासह दुसरा क्रमांक मिळाला. सर्व १६ विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक विक्रम गणेशन यांनी उपक्रमांच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रयोग, चर्चा आणि सराव सत्रे घेण्यात आली. आयोजकांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी सर्व व्यवस्था अत्यंत सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली होती. हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या यशाने संघभावना, चिकाटी आणि सकारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाचालकांनी तसेच विद्यालयाच्या प्राचार्या गगन वधवा, सर्व समन्वयक यांनी कौतुक केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिनानिमित्त उपस्थित एम.आर.

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा करण्यात आला. नगर शहरासह जिल्ह्यात कार्यरत असलेले विविध औषध कंपन्यांचे मेडीकल रिप्रेझेन्टेटिव्ह, हॉस्पिटल मधील डॉक्टर, फार्मासिस्ट यात सहभागी झाले होते. कार्यक्रमात विविध औषधे, वैद्यकीय संशोधनाची माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचवण्याच्या कार्याबद्दल एम.आर. मंडळींचा गौरव करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह असोसिएशनचे सहसचिव सिद्धेश्वर कांबळे, जैन सोशल फाउंडेशनचे सदस्य तथा ट्रोईका फार्माचे बिझनेस मॅनेजर गणेश कांकरिया, हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ. आशिष भंडारी, प्रकाश मुनोत, पवन ठाणगे, महादेव बुरगुटे (टोरेंट फार्मा), मनोज पवार (मॅनकाईंड), शशांक रोडे (सिप्ला), राहुल बोठे (थेमीस), औदुंबर शिंदे (लुपिन), अरूण दहिफळे, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, आनंदऋषीजी फार्मसीच्या दिव्या कलमदाने आदींसह सुमारे १७५ एम.आर. उपस्थित होते.

डॉ. आशिष भंडारी म्हणाले, डॉक्टर आणि औषध निर्माण कंपन्या यांच्यातील महत्त्वाचा पूल म्हणून मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह काम करतात. नवीन औषधे आणि वैद्यकीय संशोधनाची योग्य माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचवतात. ऊन, पाऊस किंवा व्यस्त कामाची पर्वा न करता ते अहोरात्र मेहनत करतात. वैद्यकीय क्षेत्रातील ते अतिशय महत्वाचा घटक आहे.

सिद्धेश्वर कांबळे म्हणाले, दरवर्षी एक ऑगस्ट रोजी मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा होतो. वैद्यकीय क्षेत्रात अतिशय महत्वपूर्ण काम करणाऱ्या एम.आर. साठी आनंदऋषीजी हॉस्पिटलने सन्मान कार्यक्रम घेऊन त्यांचा उचित सन्मान केला आहे. अशा कौतुकामुळे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. एम.आर. क्षेत्रात करिअरच्या अनेक चांगल्या संधी उपलब्ध असून यासाठी काळानुरूप बदल अंगिकारले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.पियुष मंडलेचा यांनी आभार मानले. सूत्रसंचालन दिव्या कलमदाने यांनी केले.

# अहमदनगर मुस्लिम फाउंडेशनच्यावतीने निराधार, विधवा महिलांना आर्थिक सहकार्य

नगर – अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने अपंग, निराधार, विधवा महिलांना आर्थिक मदत करण्यात आली. सेंट्रल एडवोकेट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. फारूक बिलाल शेख यांच्या हस्ते महिलांना या मदतीचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक हाजी शेख नजीर, अध्यक्ष डॉ. शेख सईद, सेक्रेटरी हाजी मुबीन तांबटकर, ट्रेझरर हाजी शेख सलीम आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. फारूक शेख म्हणाले, ही केवळ समाजसेवा नसून आपली सामाजिक जबाबदारी आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि गरजू महिलांच्या पाठीशी उभे राहणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य आहे. आज देण्यात आलेली ही आर्थिक मदत ही केवळ आर्थिक सहाय्य नसून त्यांना आत्मविश्वास, आधार आणि नव्याने जगण्याची प्रेरणा देणारी मदत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात माणुसकी, संवेदनशीलता आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होते. आपल्या आयुष्यातील अडचणींवर मात करून या महिला नव्या उमेदीनं पुढे जातील, असा आम्हाला विश्वास आहे. समाजातील सक्षम व्यक्ती, सामाजिक संस्था आणि दानशूर नागरिकांनी अशा गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात सेंट्रल ॲडवोकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ फारुक बिलाल शेख यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक करताना मुस्लिम फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेख सईद यांनी संस्थेतर्फे केल्या जाणाऱ्या वर्षभरातील विविध सामाजिक उपक्रमांची सखोल माहिती दिली. सूत्रसंचालन मुबीन तांबटकर यांनी केले. आभार शेख सलीम यांनी मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

